

# भुताचा खेळ

प्रमोद नाईकवाडे

# भुताचा खेळ

## श्री. नाईकवाडे प्रमोद लक्ष्मण

ई साहित्य प्रतिष्ठान

# भुताचा खेळ (ललित)

**लेखक: श्री. नाईकवाडे प्रमोद लक्ष्मण**

होळ, तालुका:- केज, जिल्हा:- बीड.

मोबाईल क्रमांक:- ८३२९९९१०९८, ९८२२८४८५२४

ई – मेल:- prince.naikwade09@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

## प्रकाशन :   १६ एप्रिल २०२५

©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत



नमस्कार माझे नाव प्रमोद लक्ष्मण नाईकवाडे.

मी एक शिक्षक म्हणून कार्यरत आहे.

लिखाण करण्याचा छंद २०२० सालापासून लागला.

वाचन करण्याची आवड मात्र अगोदर पासूनच होती. सर्वात पहिले कॉलेज जीवनात वाचलेली कादंबरी म्हणजे मृत्युंजय होय..

मृत्युंजय वाचताना पुढे काय होईल ? याची उत्सुकता शेवटपर्यंत वाटत होती. पुढे नारायण धारप यांच्या भयकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा वाचू लागलो.. मी लिहिलेली सदरची भयकथा श्री. नारायण धारप यांच्या लिखाणापासून मिळालेल्या प्रेरणेमुळेच लिहू शकलो..

एका ॲप वर कथा लिखाणाचे कार्य सुरूच आहे. पण ऑनलाईन जगतात ई-साहित्य प्रकाशना सोबत पण भागीदारी करावी असे खूप दिवसापासून मनात होते. ऑनलाईन स्वरूपात माझे पहिले पुस्तक प्रकाशित होत आहे याचा मनस्वी खूप खूप आनंद वाटत आहे. त्यासाठी ई-साहित्य प्रकाशनाचे मी खूप खूप आभार मानतो. ई-साहित्य प्रकाशनाचा मी कायम ऋणी राहील.

(ई – साहित्य प्रकाशन संस्थेमुळे माझ्या सारखे नवीन लेखक स्वतः चे पुस्तकरूपी स्वप्न साकारू शकत आहेत या साठी ई – साहित्य प्रकाशन संस्थेचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.)

 



# अर्पणपत्रिका

**माझ्या साठी नेहमी प्रेरणा स्रोत राहिलेल्या माझ्या दोन्ही कन्या कु.प्रितम (वय – ९ वर्षे) आणि कु.धनश्री - परी (वय २.५ वर्षे) यांच्या प्रेरणेमुळे मी हे पुस्तक लिहू शकलो.**

## प्रस्तावना

संपूर्ण कथानक वेगवान पद्धतीने रचलेले आहे. घडणारे खून आणि त्याभोवती फिरणारे कथानक. एका पोलिस अधिकाऱ्याची त्याच्या रोखठोक वागण्यामुळे दुर्गम भागात बदली होते आणि त्याचवेळी त्या भागातील दुर्गापूर गावात खुनांची मालिका सुरु झालेली होती. सदरचे घडणारे हत्याकांड थांबवण्याचे मोठे आवाहन पोलीस अधिकारी कृष्णा याच्यासमोर असते.

शहरी भागातून दुर्गम भागात आल्यावर येणाऱ्या समस्यांना तो पोलीस अधिकारी कसा सामोरे जातो हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

खून करणारा एखादा माथेफिरू आहे कि, एखादा सायलेंट किलर आहे कि एखादे भूत आहे?

भूत, पिशाच्च रक्त पिण्यासाठी, पवित्र आत्म्यांना गुलाम बनवण्यासाठी हे हत्याकांड घडवत आहेत का?

वाचक मंडळीना विनंती राहील , एकवेळ सस्पेन्स, थ्रिलने सज्ज असणारी सदर कथा एकवेळ वाचावी आणि आपला अभिप्राय नक्की द्यावा.

या कथेत पुढे काय होईल? याची उत्सुकता वाचकांना पदोपदी नक्की जाणवेल.

एक नवीन लेखक म्हणून माझे पहिलेच पुस्तक प्रकाशित करत आहे. कथा लिहिताना काही चुकले असल्यास मोठ्या मनाने माफ करावे.

**धन्यवाद!!!!!**

**चला तर मग सुरूवात करूया…………..**

# भुताचा खेळ

**(संपूर्ण कथा काल्पनिक आहे... कथेमधील सर्व कथानक हे मनोरंजनासाठी तयार करण्यात आले आहे.... याचा वास्तव जीवनाशी काहीही संबंध नाही...)**

# भुताचा खेळ

पुण्याहून सत्तर - पंचाहत्तर किमी दूर असलेल्या रायगावला (तालुक्याच्या ठिकाणी) माझी बदली झाली होती.

चार दिवसांपूर्वी मी इथे पोहचलो होतो. रायगावातील सुरुवातीचे दोन - तीन दिवस थोडे उदास आणि कंटाळवाणेच गेले होते. नवीन ठिकाणाची आणखी सवय झाली नव्हती. हळूहळू होईल सवय म्हणून मनाची समजूत मी काढत होतो.

पुण्यासारख्या चांगल्या मोठ्या शहरात दीर्घ काळ वास्तव्य केले असल्याने या लहान तालुक्याच्या गावी येऊन राहायचे म्हणजे मला मोठीच तडीपारीची शिक्षा मिळाली आहे असे वाटत होते.

असेच एकेदिवशी, स्टेशनमध्ये बाहेरच्या बाकड्यावर विचार करत बसलो होतो. कुटुंबातील सगळ्यांच्या आठवणीने जीव व्याकुळ झाला होता. आईची, बाबांची आणि लहान बहिणीची आठवण येत होती. शून्यात स्वतःला हरवून, विचारात मी गुंग झालो होतो. पुढच्या आठवड्यात आई - बाबांना भेटायला जायचा विचार मनात घोळत होता.

तेवढ्यात, "तुम्हाला साहेबांनी बोलावले आहे". बाळू कॉन्स्टेबलने वर्दी दिली. साहेबांनी बोलावून घेतले असल्याने मी लगबगीने त्यांच्या ऑफिसात गेलो. साहेबांच्या पुढे उभा राहून एक कडक सॅल्युट ठोकला.

ऑफिसात खुर्चीवर बसलेले शिंदे साहेब माझ्याकडे निरखून पाहत होते. त्यांच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले होते. ते थोडे मोठ्या आवाजात मला म्हणाले," कॉन्स्टेबल कृष्णा जाधव तुझ्यावर मी एक कामगिरी सोपविणार आहे.. करशील का दिलेले काम व्यवस्थित?"

" येस सर.." लगबगीने मी म्हणालो. सर कुठले काम सांगणार आहेत? याबाबत मनात उत्सुकता होती.

" दुर्गापूर गावात तुला जायचे आहे. त्या गावात नक्की काय चालू आहे? याचा तपास तुला करायचा आहे... तिथले पोलीस पाटील तुझ्या मदतीला असणार आहेतच आणि राहण्या - खाण्याची व्यवस्था ते स्वतः बघतील." गंभीर आवाजात शिंदे साहेब मला पुढचे नियोजन सांगत होते. (खरे तर ते माझे अंधारात जाणारे भविष्यच सांगत होते.)

ते पुढे म्हणाले, " तुला सोडायला हवालदार पांडे तुझ्यासोबत येईल आणि तुझ्या सोबतीला आणखी त्या भागातील माहितीगार असणारे दोन हवालदार पाठवत आहे.. सांभाळून काम करा." शेवटच्या वाक्यात इशारा होता की काळजी? मला वाटते दोन्ही होते.

" येस सर.. मी माझी काळजी घेईल.." मी त्यांच्या ऑफिसच्या बाहेर पडलो.

मी दुर्गापूरबद्दल विचार करत होतो.. एवढे काय महत्वाचे काम आले असेल तिथे? ते तातडीने तिथं मला जावे लागत होते?

पण मला एवढ्या लवकर पाठवायची गरजच काय होती? मी रायगावात येऊन आठवडा देखील झाला नाही आणि मला काहीच माहीत नसलेल्या दुर्गापूर गावात शिंदे साहेब पाठवत होते. कदाचित जुन्या साहेबांनी माझी काहीतरी काडी इथे केली असणार.

मला खूप वाईट वाटले. पण? नोकरी करायची आहे म्हणल्यावर तुमची जायची ईच्छा असेल किंवा नसेल. तुम्हाला वरिष्ठांनी सांगितले आहे तिकडे जावेच लागणार..मी त्यांना विरोध करू शकत नव्हतो.

पुण्यात वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत होतो. निर्भीडपणे वागत होतो, खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणत होतो. त्याचाच परिणाम म्हणून रायगावात बदली झाली, असे मला वाटायचे. आणि त्यात बरेच तथ्य होते. पण बदली होण्यास फक्त एवढे एकच कारण कारणीभूत नव्हते.

पुढे मनात प्रश्न निर्माण झाला होता. ' काय झाले असेल त्या दुर्गापूर गावात? नक्की काय काम आहे तिथं?' एक थंड हवेचे झुळूक शरीराला स्पर्शून गेल्याची भावना मनात निर्माण झाली होती. ती भावना तेवढी मनाला चांगली वाटली नाही..

जे काही झाले असेल ते तिथं गेल्याशिवाय कळणार आहे का? आणि काय झालं असणार आहे? गावातील दोन गटात वाद, हाणामारी किंवा मग कोणाचे तरी अपहरण असेच काहीतरी झाले असणार....

************

दुर्गापूर गाव!

गाव जरी शहरी भागापासून दूर असले तरी बऱ्यापैकी मोठे होते. गावातील रस्त्याचा, घरांचा, शेतीचा हळूहळू होणारा विकास दिसून येत होता. (म्हणजे कासवाच्या गतीने काम सुरू होते..)

गावात पूर्वेला दुर्गा देवीचे पुरातन मंदिर होते. त्याच देवीच्या नावावरून गावाला दुर्गापूर नाव पडले होते. दुर्गा देवीच्या मंदिराच्या मागच्या बाजूने नदी वाहत होती. तिचे नाव हिरळा नदी होते. ती पुढे उत्तरेला वाहत जात होती.

गावाच्या उत्तर – पश्चिमेला भोप्या डोंगराची रांग गेली होती. डोंगरावर, डोंगराच्या आजुबाजूला दाट झाडी होती.

डोंगर दऱ्यात वसलेल्या दुर्गापूर गावाला चांगला रस्ता नव्हता. वीज गावात पोहचली होती. पण ती वीज सुरू असण्यापेक्षा बंदच जास्त असायची. गावात इतर आधुनिक सोयी सुविधा आणखी पोहचल्या नव्हत्या. बऱ्याच प्रमाणात दुर्गापूर गाव तालुक्यावर अवलंबून होते.

मी जरी मोठ्या नाखुशीने दुर्गापूर गावात दाखल झालो असलो तरी पण अचानक मला त्या गावात पाठवण्यासाठी कारणही तसेच घडले होते. घटनाही तशीच भयानक घडली होती. आणि सरांनी मला का या गावात पाठवले असेल त्याचाही हळूहळू अंदाज येऊ लागला होता.

दुर्गापूर गावातील एका संतोष नावाच्या तरूणाने आत्महत्या केली होती. चांगल्या श्रीमंत घरातील व्यक्तीने आत्महत्या केली असल्याने सगळे गाव हळहळ व्यक्त करीत होते.

पण आत्महत्या झाल्याच्या बरोबर तीन दिवसांनी , त्या संतोष नावाच्या तरूणाच्या घरातील एका नोकराचा (बाबुराव) मृतदेह घराच्या मागच्या बाजूच्या बागेतील नारळाच्या झाडांच्या आळीत छिन्न - विछिन्न अवस्थेत आढळून आला होता.

सगळ्या गावाला धक्का बसला होता. गावातील एकाच घरातील दोन लोकांचे तीन दिवसांच्या अंतराने मृत्यू होणे ही बाब घटनेला वेगळ्या अर्थाने पाहण्यास पुरेशी होती.

गावात नाही नाही त्या विषयाला बोलण्यास सुरूवात झाली होती. लोकं कुजबुजत बोलत होती. संतोषच्या मृत्यूचा विषय चवीने चघळत होती. त्या नोकराला घरातीलच कोणीतरी मारलंय. त्या संतोषच्या बायकोचे आणि त्या नोकराचे लफडे सुरू होते म्हणे आणि त्यातच संतोषने नैराश्यात येऊन आत्महत्या केली होती.

काहीजण म्हणत होते, संतोषला त्याच्या घरात कोणीच किंमत देत नव्हते. त्यामुळे त्याने घरात गळफास लावून आत्महत्या केली. लोकांच्या तोंडून हे सगळे विषय ऐकून माझ्या मनात संतोषबद्दल एकप्रकारची आत्मियता निर्माण झाली होती.

कारण जसे त्याला त्याच्या बायकोने धोका दिला होता. तसेच मला माझ्या प्रियसीने / शितलने धोका दिला होता.

तिचा विषयही आता मनात नको म्हणून मी डोळे मिटून घेतले.

आम्ही सर्वजण सकाळी चौकीत हजर झालो होतो. तपास करायला सुरूवात करायची होती. त्या (माझ्यासारख्या बिचाऱ्या) संतोषच्या घराला भेट द्यायची होती.

चौकी, दगडी बांधकाम केलेली होती. गाव थोडे आडवळणी बाजूला असल्याने त्या गावात सेपरेट पोलिस चौकी मंजूर झाली होती. दोन - तीन पोलिसांच्या राहण्याची व्यवस्था त्या चौकीत करता येत होती. एक मोठी रूम कार्यालय होती, आणि दुसरी रूम अडगळीची होती. त्या रूममध्ये जुने सामान , तुटलेल्या खुर्च्या , मोडकळीस आलेले जुने टेबल, पत्रे पडून होती. त्या अडगळीच्या रूमच्या मागच्या बाजूने बाथरूम होते, टॉयलेट होते.

चौकीवर लोखंडी पत्रे टाकलेले होते. भिंतीना लावलेला रंग उडून गेला होता. भिंतीना असणाऱ्या खिडक्यांना दुधाळी रंगाचे काच लावण्यात आली होती.

आमच्या जेवणाची सोय आबा पाटील (गावचे पोलिस पाटील) यांच्या घरी करण्यात आली होती.

*********

" सायब, नाश्ता पाणी बरं होत न्हव?" पोलीस पाटील आबा चौकीच्या दरवाज्यातून खाली वाकून पुढं येत म्हणाला.

" आबा लय झकास झाला नाश्ता.. मिसळीतला (मिसळ पाव) झणझणीत रस्सा भारी होता.." कॉन्स्टेबल सुरेश नाश्त्याची स्तुती करत म्हणाला. दुसऱ्या सहकाऱ्याने, कॉन्स्टेबल रवीने देखील सुरेशच्या बोलण्याला सहमती दर्शवली.

मी मात्र समोरच्या टेबलकडे निर्विकार चेहऱ्याने पाहत होतो. मला सुरेशचे बोलणे आवडले नाही. कदाचित मी त्यांचा प्रमुख असल्याने पोलीस पाटील याच्या प्रश्नाला मी उत्तर देणे भाग होते, त्यांनी , माझ्या हाताखालच्या नोकरांनी नाही असे मला वाटले.

आबांना समोरच्या खुर्चीवर मी बसायला सांगितले. मनात संतोषच्या विषयी विचार चालू होते.

" तर आबा आम्हाला त्या मृत पावलेल्या संतोषबद्दल बरेच काही ऐकायला मिळाले. त्यातील किती खरे आणि किती खोटे होते ते सांगता येणार नाही पण तुम्ही आणि संतोष एकाच गावातील ना? मग तुम्हाला नाही का माहीत संतोषचा कसा मृत्यू झाला ते?" माझ्या थेट प्रश्नाने आबा थोडा हबकला होता.

त्याच्या डोळ्यात मला सुरूवातीला भिती दिसली पण थोड्यावेळाने नाटकी हसत हसत आबा बोलू लागला," सायब.. सायब...संतोष हाय आमच्या गावातला.. पर त्यो कधी घर सोडून बाहेर गावात आलाच नाही..तो घरातच असायचा दिवसभर. लग्नाच्यापूर्वी तरी तो गावात उल्सक (थोडेफार) फिरायचा पण लग्न झाल्यानंतर

मातुर तो दिसायचा बंदच झाला.. घरातच तो घरकोंबडा म्हणून राहत होता.. त्याच्या बायकोचा.." डोळे मोठे करून, हातवारे करत आबा बोलत होता. त्याच्या बोलण्यात आश्चर्यमिश्रित संताप होता.

" बायकोचा घरकोंबडा? म्हणजे?" मी खुर्चीवर पुढे झुकून म्हणालो. आबाच्या बोलण्याचे मला आश्चर्य वाटले.

" सायब म्या खर तेच सांगतूया.. त्याची बायको लय सुंदर हाय म्हण..आणि .. आणि मायावी पण हाय म्हणून तो तिच्या शब्दा बाहेर नसायचा.. तिच्या ताब्यात होता तो.." आबा तोंड वाकड करत म्हणाला.

मी आबाच्या बोलण्याला प्रत्युत्तर दिले नाही. डाव्या बाजूच्या खिडकीतून मी बाहेर पाहू लागलो. मनात असंख्य विचार जन्माला येत होते.

' मायावी? सुंदर? किती सुंदर? एखाद्या स्वर्गीय अप्सरे सारखी का? माझ्या शितल इतकी का? हंsss माझी शितल? पण शितल माझी होती का? ' माझे मन पुन्हा शितलच्या विचारांनी घेरले जाऊ लागले.

" सायब चलायचं ना मग?" आबा खुर्चीवरून उठत म्हणाला.

" होय.. चला.." आम्ही त्या रहस्यमयी पद्धतीने आत्महत्या केलेल्या संतोषच्या घराकडे जायला निघालो..

************

दुर्गापुरच्या उत्तरेला एक टेकडी होती. टेकडीच्या पायथ्याशी, जिथून हिरळा नदी वळसा घालून पुढे वाहत जात होती. त्या ठिकाणी किनारी भागापासून दोन - अडीचशे मीटर दूर उंचवट्यावर संतोषचा बंगला होता. (नदीला पूर आला तरी पाणी बंगल्यापर्यंत येत नव्हते.) बंगल्याच्या समोरच्या, आणि दोन्ही डाव्या - उजव्या बाजूने कुंपण होते. (मागची बाजू वगळून) कुंपणाच्या वीस फूट अंतरापर्यंत मोकळी जागा होती. नदीची बाजू वगळता इतर बाजूनी घराच्या भोवती घनदाट झाडी होती.

बंगल्याच्या मागच्या बाजूने फळ झाडांची बाग होती. त्या बागेत नारळ, चिकू, आंबा, चिंच यांची झाडे होती. काही औषधी वनस्पती होत्या, काही फुलांची झाडे होती. घराच्या मागच्या बाजूने चांगला पाऊण एकर परिसर त्या बागेने व्यापला होता. बागेत एक स्टोअर रूम (छोटे गोडाऊन) होती. त्यात बागेला लागणारे सर्व प्रकारचे साहित्य होते. कुदळ - फावडे यापासून ते बागेतील झाडांना लागणाऱ्या रासायनिक औषधापर्यंत सर्वकाही सामान त्या रूममध्ये होते.

गावापासून तो बंगला थोडा दूर अंतरावरच होता.

" आबा, संतोषचे घर गावापासून बरेच दूर आहे? एवढे दूर घर कोण बांधतो का? काय कारण घडले असेल ते इथे घर बांधावे लागले? " सोबत चालणाऱ्या आबाला मी विचारले.

मला वाटत होत की, घराचा मालक एकांतप्रिय असेल.

जसे पुण्याच्याजवळ असणाऱ्या लोणावळा - खंडाळा येथे मोठे लोक फार्म हाऊस खरेदी करतात आणि सुट्टी घालवायला तिथं येतात तश्यातला हा प्रकार वाटला.

धापा टाकणारा आबा पायवाटेच्या बाजूला असलेल्या एका झाडापाशी थांबला आणि बोलू लागला, " सायब तो बंगला संतोषच्या बापाने, धरमराव याने बांधला हाय.. धरमराव मूळचा मुंबईचा त्याने गावात एकांत ठिकाणी जागेची निवड केली. आणि इथे तो बंगला बांधला. गावातील लोकांसोबत धरमराव याने जास्त काही संबंध ठेवला नाही.

स्वतः च्या श्रीमंतीचा माज म्हणा नाही तर आणखी काय म्हणा. तो माणूस शेवटपर्यंत कधी गावातील लोकांशी बोललाच नाही. त्याचे गूढ वागणे आम्हा गावकऱ्यांना पसंद नव्हते. त्याच्या या घरात बाहेरच्या मांत्रिकांचा राबता होता. आणि सायब म्या आणखी एक ऐकलाय..या बंगल्याच्या खाली तळघर हाय म्हण! तो धरमराव मोठा विचित्र व्यक्ती होता."

"पुढे त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांनी या बंगल्यावर राहायला सुरूवात केली. बाहेरच्या शहरातील सगळी मालमत्ता विकून इथेच तीस एकर जमीन घेऊन त्यांनी स्थायिक व्हायचा विचार केला. आणि आज बागायतदार शेतकरी म्हणून ते इथे मिरवतात.. " आबाच्या बोलण्यातून संतोषच्या कुटुंबावर असणारा राग व्यक्त होत होता.

त्या नदीकाठी असलेल्या बंगल्याचे गूढ आणखी वाढत होते.

आम्ही बंगल्याच्या दिशेने जाऊ लागलो. थोडे पुढे गेल्यावर दाट झाडी लागली होती. आंब्याचे, पेरूचे, जांभळाचे झाडे तिथं होती. काही फुलांची झाडी होती तर काही बाभळीची काटेरी झाडे होती. त्या झाडीतून आम्ही पुढे जाऊ लागलो.

खळखळ वाहणाऱ्या पाण्याचा आवाज तिथल्या शांत आणि गूढ वातावरणाला भेदत होता. आम्ही झाडीच्या बाहेर मोकळ्या जागेत आलो.. आणि मोकळा श्वास घेतल्याची भावना मनाला झाली होती.

आमच्या समोर तो दोन मजली अवाढव्य आकाराचा बंगला एखाद्या बलवान असुराप्रमाणे दणकटपणे उभा होता.

का कुणास ठाऊक पण मला पाहताक्षणी तो बंगला अजिबात आवडला नाही. कदाचित त्याच्याबद्दल असणाऱ्या अती उत्सुक्तेमुळे असेल किंवा पूर्वग्रहदुषित मत झाल्यामुळे असेल पण मला तो बंगला आवडला नाही.

बंगल्याच्या चहूबाजूंनी तारेचे काटेरी कुंपण केले होते. आणि समोरच्या बाजूने गेट होते. गेटपासून मुख्य दरवाज्याचे अंतर जेमतेम वीस – तीस फूट असेल..

" हाss आलो बंगल्याच्या आवारात तुमच्या.." आबा निःश्वास टाकत, कपाळावर जमा झालेला घाम पुसत म्हणाला.

" किती सुदंर आहे! लोकेशन पण छान आहे.. इथे सुट्टी घालवायला किती मजा येइल नाही?" सुरेश त्या बंगल्याकडे पाहत बोलत होता. त्याच्या नजरेत एक वेगळीच चमक होती. एकीकडे सुरेश बंगल्याचे गुणगान गात होता पण रवी मात्र अस्वस्थ वाटत होता. तो इकडे तिकडे पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर दिसणारी अस्वस्थता मनाला बेचैन करणारी होती.

‘ रवीला अचानक काय झालं आहे?’ माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला होता. मी रवीच्या संशयास्पद वागण्याकडे दुर्लक्ष केले आणि सुरेशकडे पाहून त्याला म्हणालो, " सुरेश आपण सध्या तरी कामावर लक्ष देऊ.. लोकेशनचे, सुट्टीचे नंतर पाहू.." माझ्या बोलण्याने बहुतेक सुरेश दुखावला गेला होता. तो काहीच न बोलता दुसरीकडे पाहू लागला.

मी नवीन असल्याने कदाचित त्यांनी मला बॉस म्हणून स्वीकारले नसेल त्यामुळे तो असे वागत असेल. मी माझ्या मनाची समजूत घालत होतो.

**************

मी समोर उभ्या असलेल्या त्या वास्तूकडे पाहू लागलो. दोन मजली इमारत होती ती. दगडी बांधकाम असणारा तो बंगला करड्या रंगात भव्य दिसत होता. पण बऱ्याच ठिकाणी भिंतीचा रंग उडाला होता. कुठे कुठे भिंतीचे धपले निघाले होते.

वरच्या मजल्यावर कौलारू छतासारखी डिझाईन तयार केली होती. दोन धुराडे उंचावरून लक्ष वेधून घेत होते. खालच्या आणि वरच्या मजल्याची रचना जवळपास सारखीच दिसत होती. बंगल्याच्या मागच्या आणि पुढच्या बाजूने गॅलरी होती.

बंगल्याच्या आत समोर हॉल, हॉलच्या मागे पॅसेज होता. पॅसेजच्या दोन्ही बाजूंनी रूम होत्या. खालच्या मजल्यावर हॉलला लागूनच रेस्टरूम होती. तिच्या बाजूला डायनिंग हॉल, त्या नंतर किचन अशी रचना बंगल्याच्या डाव्या बाजूला होती.

उजव्या बाजूला एक बेडरूम, देवघर आणि स्टोअर रूम होती. त्याच्या मागे बंगल्यातील नोकरांसाठी राहायला छोट्या पत्र्याच्या खोल्या होत्या. बाजूलाच बाथरूम – टॉयलेट होते. त्या मागे बंगल्याचे संरक्षक कुंपण होते. कुंपण संपल्यावर तिथून पुढे फळ झाडांची दाट बाग सुरू होत होती.

बंगल्याच्या समोरच्या बाजूने खाली जिथे हॉल होता तिथं वरच्या मजल्यावर बेडरूम होती. आणि बेडरूमच्या मागे पॅसेजमधून आणखी दोन्ही अंगाला दोन अश्या चार रूम होत्या. वरच्या मजल्यावर जायला खालच्या मजल्यावरील हॉलच्या डाव्या बाजूच्या अंगणातूनच पायऱ्या होत्या.

त्या घराचे सौंदर्य बघून मनाला त्या धरमरावबद्दल असूया वाटत होती. ' काय डोक लावून युरोपीय पद्धतीने घराची बांधणी त्याने केली होती. किती सुंदर आणि आकर्षक! खरच किती नशीबवान होता तो की ज्याला स्वतःचे भव्य घराचे स्वप्न

पूर्ण करता आले असेल?' माझ्या मनात न कळतपणे धरमराव आणि माझी स्वतःची तुलना करू लागलो.

" सायब मोठा माणूस होता धरमराव पण जेव्हा हिथ (इथे) या घरात वारला, मरण पावला तेव्हा चार - पाच दिवस कोणाला पत्ताच नव्हता की घराचा मालक बाथरूममधल्या फरशीवर पाय घसरून, डोक्याला मार लागल्याने मरण पावला आहे. जेव्हा त्या शरीराचा सगळीकडे दुर्गंध पसरला तेव्हा लोकांना कळले काय झाले आहे ते." आबा धरमरावबद्दल, घराच्या मालकाबद्दल माहिती देऊ लागला होता.

" लोकांनी मुंबईत असणाऱ्या धरमरावच्या दोन्ही मुलांना त्यांचे वडील मरण पावले आहेत हे कळवले आणि पाच ते सहा तासांच्या आत गावात यायला सांगितले. गावातील प्रथेप्रमाणे मृतदेहाचे सहा तासांच्यापूर्वी दहन करावे लागणार होते. पण तरी देखील धरमरावला अग्नी द्यायला त्यांचा कोणताही वंशाचा दिवा शहरातून गावात आला नाही.. आम्ही गावकऱ्यांनी प्रथेप्रमाणे धरमरावचा अंत्यसंस्कार केला."

मोठा श्वास सोडत आबा म्हणाला," कितीही मोठा माणूस असला तरी समाजातील इतर लोकांची त्याला कधी ना कधी गरज लागतेच..त्या धरमरावच शरीर पाच दिवसात घरातील उंदरांनी, कीटकानी, किड्यांनी नासवून टाकलं होतं. किती मोठा माणूस होता.. पण काय नशिबी आले त्याच्या? शेवट खूप वाईट झाला त्याचा." आबा हळहळ व्यक्त करत होता. त्याचे बोलणे ऐकून माझा जीव कासावीस

झाला होता. एखाद्याला वृद्धापकाळाने मृत्यू यावा पण एवढा भयानक मृत्यू कोणालाही येऊ नये..

'मी थोड्यावेळापूर्वी धरमरावचा देखणा बंगला बघून हरखून गेलो होतो. धरमरावला मी मोठा नशीबवान म्हणत होतो आणि आता त्याच्या मृत्यूची कहाणी ऐकून असे वाटत आहे की, त्याच्या इतका दुर्दैवी कोणीच नव्हते..'

**********

" चला आत घरात जाऊया आणि आपल्या कामाला सुरूवात करूया." घराकडे निरखून पाहणाऱ्या आबा आणि इतर सहकाऱ्यांना मी म्हणालो. मी सहज सर्वांकडे नजर फिरवली. आबा घरात यायला उत्सुक नव्हता. त्याच्या कपाळावर आठ्या पसरल्या होत्या.

आम्ही सर्वजण मुख्य दरवाज्यात येऊन उभे राहिलो होतो. दारावर असणारी बेल वाजवली. आतून कसलाही प्रतिसाद नाही. पुन्हा एकवेळ बेल वाजवली. घरातून कोणीतरी धावत पळत दरवाज्याकडे लगबगीने येत असल्याचे जाणवले. पावलांचा आवाज येत होता.

कुईsssकुईsssआवाज करत दरवाजा उघडला गेला.

" बोला काय पाहिजे?" घरात काम करणाऱ्या एका महिलेने दरवाजा उघडला होता.

" आम्ही पोलीस आहोत. तुमच्या घर मालकांना भेटायला आलो आहोत. घर मालक आहेत का? त्यांना भेटायचे आहे." कॉन्स्टेबल सुरेश तिच्याकडे एकटक पाहत म्हणाला. त्याची नजर त्या तरूण आणि सुंदर दिसणाऱ्या महिलेच्या अंगावरून एकसारखी फिरत होती. त्या महिलेने ते चटकन ओळखले आणि स्वतः ला सावरून ती पुढे म्हणाली, " थांबा दोन मिनिट. आहेत मालक आत, त्यांना सांगते."

ती महिला आली तशी निघून गेली. आम्ही सगळे दारातच तिष्ठत उभे होतो. आणि या गोष्टीचा मला प्रचंड राग आला होता. ' घरी आलेल्या लोकांना अश्या पद्धतीने जास्त वेळ दारात उभे करणे म्हणजे भेटायला आलेल्या लोकांचा अपमान करणे आहे..’

’ती महिला आम्हाला हॉलमध्ये बसा असे देखील म्हणू शकली असती ना? मला त्या घरात काम करणाऱ्या महिलेचे वागणे अजिबात पटले नाही. जर घरात काम करणारा नोकर वर्ग असे घरी येणाऱ्या लोकांच्यासोबत तुसडेपणाने वागत असेल तर घराचा मालक कसा वागत असेल?'

थोड्याच वेळात एक जाड जुड इसम त्या हॉलमध्ये अवतरला होता. अंगावर नाईट ड्रेस होता. त्याचे डोळे चायनीज लोकांच्या सारखे बारीक दिसत होते. डोळ्यांवर असणाऱ्या भुवया दाट होत्या, डोळ्यांना चष्मा होता. गाल, मान

फुगल्यासारखे दिसत होते. तो हळूहळू चालत (स्वतःचे शरीर सावरत) एका सोफ्यावर जाऊन बसला आणि आम्हा सर्वांना आत येण्याची त्याने खूण केली.

*************

आम्ही सर्वजण बाजूला सोफ्यावर बसलो होता. तो आम्हा सर्वांना न्याहळत होता. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा त्रासिकपणा दिसत होता.

" बोला काय काम काढल?" आबाकडे पाहून त्याने विचारले. आमच्या सगळयांमध्ये आबाच त्याच्या ओळखीचा होता.

" मुरलीधर सावकार साहेब नमस्कार, आम्ही..आम्ही संतोष साहेबांच्या मृत्यूनंतर अचानकपणे तुमच्या नोकराचा झालेला मृत्यू त्याबाबत चर्चा करायला आलो होतो. आ...."

" एखाद्याचा मृत्यू होणे ही गोष्ट काय चर्चा करण्यासारखी आहे का?" आबाचे वाक्य पूर्ण न होऊ देता मुरलीधर सावकार आबावर मोठ्याने कडाडला.

" तुम्ही चर्चा करायला आला आहात का इथे?" तो आम्हा सगळयाकडे पाहून पुन्हा एकवेळ खेकसला. माझ्या हाताच्या मुठी नकळतपणे आवळल्या गेल्या.

" अहो, सर तुमच्या भावाचा आणि घरातील नोकराचा मृत्यू कसा झाला आहे? तुम्हाला कोणावर डाऊट आहे का? हे तुम्हाला विचारावे लागेल ना? आणि तुम्हाला विचारायचे आहे म्हणजे तुमच्यासोबत चर्चा करावी लागेल? म्हणून आबा तुम्हाला म्हणाले की, चर्चा करावी लागेल.." माझ्या अनपेक्षित उत्तराने तो चमकून माझ्याकडे पाहू लागला. माझ्याकडे तो खाऊ की गिळू नजरेने पाहत होता. मी त्याला बरोबर कात्रीत पकडले होते.

तो जसा शब्दाला धरून आबावर ओरडला होता. तसेच शब्दाला धरून मी त्याला बोलल्यामुळे त्याला पुढे काही बोलता आले नाही. तो आतल्या आत धुमसत होता.

" हाss बोला..करा चर्चा.." त्याच्या आवाजाची धार आणखी वरच्या लेवलची होती.

घसा खाकरून मी त्याला बोलू लागलो," हे पहा मुरलीधर साहेब आम्ही इथे तुमच्या भावाने केलेली आत्महत्या आणि तुमच्या एका नोकराचा झालेला खुन याच्याबाबतीत चर्चा करायला आलो आहोत. आणि घरातील सगळ्यांचे जबाब नोंदवायला आलो आहोत." मी तपशीलवारपणे मुरलीधरला मुद्दा पटवून देत होतो.

" हंss काय जबाब घेणार तुम्ही आता? मरणारे तर केव्हाच मरून स्वर्गात निघून गेले.." हात उडवत त्याने उत्तर दिले. त्याच्या बोलण्यात दुखाऐवजी एकप्रकारचा उर्मटपणा असल्यासारखे मला वाटले.

" ही पोलिसांची प्रोसिजर आहे.. तेव्हा साहेब प्लीज आम्हाला सहकार्य करा.." माझी विनंती त्याच्या अहंकाराला सुखावून गेली.

" ठीक आहे, करा तुम्हाला काय चौकशी करायची आहे ती.." मुरलीधरने आढेवेढे घेत संमती दिली होती.

***************

मुरलीधर सावकार यांच्या घरात जेवढे सदस्य उपस्थित होते त्या सर्वांचे आम्ही जबाब घेतले होते. ज्या ठिकाणी संतोषने गळफास लावून आत्महत्या केली होती ती खालच्या मजल्यावर, हॉलच्या मागे डायनिंग रूमच्या शेजारी असणारी रेस्टरूम बघितली. ज्या ठिकाणी (बागेत) घरातील नोकराची हत्या करण्यात आली होती तिथं घराच्या मागच्या बाजूला असणाऱ्या बागेत जाऊन तपासणी केली.

रात्रीचे नऊ वाजले होते. आबाच्या घरून नुकतेच जेवण करून आम्ही चौकीवर आलो होतो. खालच्च्या फरशीवर आम्हाला झोपण्यासाठी चटई अंथरली होती.

सुरेश आणि रवी दोघेही चटईवर झोपी गेले होते. रवी चांगलाच घोरत पडला होता. आबाच्या घरी जेवायला जाण्यापूर्वी रवी कुठेतरी बाहेर निसटला होता. आणि दहा ते पंधरा मिनिटांनी वापस आला होता. कुठे गेला होता तो? रवीबद्दल मला आणखी माहिती घ्यावी लागणार होती.

त्या दोघांना गाढ झोप लागली होती आणि मी?

मी मात्र सताड उघडे डोळे ठेवून वरच्या गंजलेल्या लोखंडी पत्र्यांकडे बघत बसलो होतो. फॅन होता पण तो नादुरुस्त होता.

मी या भागात नवीन असल्याने मला झोपच येत नव्हती.

डोक्यात असंख्य विचार येत होते. एक विचार येऊन जात होता, त्याच्या ठिकाणी दुसरा विचार जन्म घेत होता. नकारात्मक विचारांची मालिका मनात तयार होत होती.

' संतोषने खरच आत्महत्या केली होती का? बरं केली असेल तर का? कशामुळे? कोणाच्या दबावाखाली येऊन त्याने हे कृत्य केले असेल?'

आज संतोषच्च्या घरातील उपस्थित असणाऱ्या सगळयांचे आम्ही जबाब घेतले होते.

मुरलीधर,

किरण (मुरलीधरची बायको),

अनिता (घरात स्वयंपाक करणारी बाई),

पक्या आणि सुभ्या (घरातील दोन नोकर),

पण संतोषची बायको (रिया) घरात उपस्थित नव्हती. माहेरला गेली होती. त्यामुळे तिचा जबाब घ्यायचा राहिला होता.

'हंऽऽकाय बाई आहे.. नवरा मरण पावला आहे, निदान बारा - तेरा दिवस तरी तिने घरात थांबायला पाहिजे होते. पण लगेच माहेरी निघून गेली. कसे काय?'

प्रत्येकाने दिलेला जबाब मी आठवू लागलो. सगळयांच्या जबाबात एक कॉमन गोष्ट घडली होती. संतोष हा सरळ साधा व्यक्ती होता. त्याचा स्वभाव भोळा होता. आणि त्याच्या भोळया भाबड्या स्वभावाचा गैरफायदा त्याची बायको रिया उठवायची. सारखे दर पंधरा दिवसांनी ती माहेरला जायची. जसे आता गेली आहे तसे.. माझा त्या बाईवर सुरुवातीपासूनच जास्त संशय होता.

आणि आणखी एक गोष्ट जबाबात उघडकीस येत होती. ती गोष्ट काही म्हणावी तेवढी चांगली नव्हती. मनात भिती निर्माण करणारी होती. काहीजणांना संतोष पुन्हा दिसला होता. आणि त्या बागेत मरण पावलेल्या नोकराचे, बाबुरावचा खून कोणी केला होता ते आणखी स्पष्ट झाले नव्हते.

आणि जो तो खाजगीत म्हणत होता, संतोषनेच त्याला मारले. हंsss, हे लोक मेलेल्या संतोषने त्या बाबुरावला मारले आहे असे म्हणत आहेत. लोकांना वेड लागलंय का काय? असे मला वाटत होते.

विचार करतच मी डाव्या कुशीवरून उजव्या कुशीवर झालो. माझ्या बाजूला झोपलेला सुरेश चांगलाच घोरत पडला होता.

****************

सकाळी लवकर उठून आम्ही पुढच्या कामाला लागलो. शिंदे साहेबांना कालच्या कामाचा रिपोर्ट पाठवायचा होता. आणि या डोंगराळ भागातील, या गावातील काम संपवून इथून आम्हाला लवकर निघून जायचे होते.

"संतोषची हत्या झाली आहे का? की त्याने आत्महत्या केली आहे? काय वाटत तुम्हाला? " मी चौकीत विषय छेडला.

बाजूला मोबाईलमध्ये शॉर्ट्स पाहण्यात गुंग असलेल्या रवीने चमकून माझ्याकडे पाहीले. त्याचे डोळे लालभडक दिसत होते.

" काही सांगता येत नाही सर.. मे बी त्याने आत्महत्या केली असेल किंवा नसेल ही.." रवीने मोबाईलमध्ये पाहतच प्रश्नाचे उत्तर दिले. त्याचे डोळे लाल दिसत

होते. बहुतेक रवी रात्रीच्या वेळी ड्रिंक करतोय का? माझा एक अंदाज. कारण बऱ्याचदा तो काही न सांगता बाहेर कुठेतरी जात असतो...

पण रवीच्या अश्या बेफिकीरपणाचा, त्याच्या उत्तर देताना दाखवलेल्या उद्दामपणाचा मला प्रचंड राग आला.

मी त्याला काहीतरी बोलणार तेवढ्यात बाजूला भिंतीला लटकवलेल्या आरशासमोर उभे राहून भांग पाडणारा सुरेश म्हणाला," सर अहो या डोंगराळ, दुर्गम भागात अश्या घटना नेहमीच घडतात. आणि आपल्याला , तालुक्याच्या ठिकाणी खूप उशिरा माहिती मिळते..आता संतोषच्या आणि त्या बाबुरावच्या केसचे पहा.. ते मरून आठवडा होऊन गेले आहे.. आणि आता आपण संतोषने आत्महत्या का केली? आणि बाबुरावला कोणी मारले? ते शोधणार आहोत.. त्या दोघांच्या मृत्यूनंतर इतक्या दिवसात सर्वकाही प्रूफ मिटून गेले असणार ना?"

सुरेशच्या बोलण्यात तथ्य होते. या केसच्याबाबत आम्हाला खूप उशीर झाला होता. सुरेश पुढे बोलत होता," ही एकच चूक नाही सर. या केसचा चार्ज तुमच्यासारख्या नवीन माणसाला देण्यात आला. ज्याला या दुर्गम भागातील काहीच माहिती नाही.." माझ्याकडे थोडे संकोचून पाहत सुरेश बोलला. त्याला वाटत होते त्याच्या बोलण्याचे मला वाईट वाटेल. पण मला त्याच्या बोलण्याचा राग आला आहे किंवा मला वाईट वाटले आहे असे मुद्दामहून मी त्याला दाखवले नाही.

" हो बरोबर आहे सुरेश तुझे , पण मला तुमच्यासारखे मार्गदर्शन करणारे, या भागाची माहिती असणारे साथीदार मिळाले आहेत त्यामुळे मला भिती नाही." मी

सहज बोलून गेलो पण माझ्या साध्या - सहज बोलण्याचा परिणाम झाला. दोघांना मोठेपणा दिल्याने त्यांना बरे वाटले.

आज दिवसभर गावात सगळीकडे फेरफटका मारायचा आम्ही निर्णय घेतला होता. सावकार यांच्या बंगल्याच्या आजूबाजूच्या परिसराला आम्ही भेट दिली.

आम्ही जिथे भेट द्यायला जायचो तिथं उपस्थित असणारे गावातील लोक आमच्याकडे जरा संशयाने आणि विचित्र नजरेने पाहायचे.

गावातील दुर्गामातेच्या मंदिराला आम्ही भेट दिली. मातेचे दर्शन घेतल्याने मनाला बरे वाटले.

संध्याकाळी गावातील एका खानावळीकडे आम्ही जेवणं करण्यासाठी निघालो.. जेवायला जाण्यापूर्वी रवी दहा मिनिटात कुठेतरी जाऊन येतो म्हणाला.

" रवी कुठे गेला आहे? " मी सुरेशकडे संशयाने पाहत विचारले.

" हांss ते मला पण माहीत नाही सर.." खाली जमिनीकडे पाहत सुरेशने उत्तर दिले. सुरेशने माझ्याकडं न पाहता उत्तर दिले होते म्हणजे सुरेश खोटे बोलत होता. त्याला माहीत होते रवी कुठे गेला आहे ते. पण त्याला मला कळू द्यायचे नव्हते.

" त्याची (रवीची) गावात कुठे ओळख आहे का? " ते दोघे (सुरेश आणि रवी) याच भागातील असल्याने मी सुरेशला पुन्हा एकवेळ विचारले.

" नाही सर , याबद्दलही मला काही माहिती नाही.." सुरेश तितक्याच नम्रपणे मला खोटे बोलत होता. मी पुढे काही त्याला विचारत बसलो नाही.

थोड्याच वेळात रवी खानावळीत हजर झाला. आमच्यापासून थोडे दूर अंतरावर तो जेवायला बसला. मी त्याच्या डोळयांकडे पाहत होतो, त्याच्या एकूण हालचालीत काही बदल होत आहे का ते निरीक्षण करत होतो. पण मला त्याच्या वागण्याचा काही अंदाज येत नव्हता. बहुतेक ड्रिंक करायला तो बाहेर गेला असेल..म्हणून मी जास्त विचार न करता समोर आलेल्या जेवणावर लक्ष केंद्रित केले.

आम्ही तिघांनी जेवणं आटोपली. पुन्हा गप्पा मारत आम्ही चौकी गाठली. रात्रीचे नऊ वाजले होते. गार वारा अंगाला झोंबत होता. आज दिवसभर फिरून कंटाळा आला होता. पाय दुखत होते. त्यामुळे लवकरच झोप लागणार होती. झोपण्यापूर्वी आम्ही चौकीत चर्चा करत बसलो होतो. तेवढ्यात सावकार यांच्या घरात काम करणारा नोकर तिथं चौकीवर धावत पळत आला.

चौकीच्या लाकडी दरवाज्यात उभे राहून तो उजवा हात उत्तर दिशेला जोर जोरात हलवत होता. उत्तर दिशेला बोट दाखवत होता. आम्हाला तो काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता. पण जास्त धावल्याने त्याचा दम भरला होता. त्याचा ऊर धपापत होता. भितीने काळजून गेलेल्या त्याच्या काळया सावळया चेहऱ्यावरून घामाच्या धारा वाहत होत्या.

" अरे काय झालं आहे? काय घडले आहे?" मी त्याला विचारले. माझ्यासहीत खाली चटईवर बसलेले सर्वजण उठून उभे राहीले.

" हा तिथं सावकार यांच्या बंगल्यावर काम करतो सर. थांबा त्याला मी विचारतो काय झाले आहे ते?" सुरेश काळजीने पुढे आला. आणि त्या नोकराच्या जवळ गेला.

" काय झालं रामू? सगळ ठीक आहे ना?" सुरेश हातवारे करत त्याला म्हणाला.

" सायsss, सायsssब, सायब चला लवकर घात झालाय.. चला लवकर वाड्यावर..(बंगल्यावर) " तो नोकर रामू मोठ्याने ओरडत म्हणाला. बोलताना त्याचे शब्द अडखळत होते. त्याच्या डोळ्यात मूर्तिमंत भिती दिसत होती.

आम्ही त्याला कुठलाही जास्तीचा प्रश्न न विचारता त्याच्या सोबत धावत – पळत, जसे जमेल तसे वेगानं झाडी – झुडपातून, काट्या कुपाट्यातून बंगल्याकडे जात होतो.

सोबतीला संकटात वापरायचे सर्व प्रकारची हत्यारे आम्ही जवळ घेतली होती.

आम्ही अंधारातून टॉर्चच्या सहाय्याने धावत सावकार यांच्या बंगल्यापर्यंत पोहचलो. पायऱ्यांवरून लगबगीने मुख्य दरवाज्यापर्यंत गेलो. सोबत आलेल्या रामूने आम्हाला हॉलच्या दरवाज्यातूनच मागे एका उघड्या रूमकडे थरथरत्या हाताने खूण केली. तो नोकर हॉलच्या दरवाज्यातच थबकला होता. त्याचे विस्फारलेले डोळे काहीतरी भयानक घडले आहे याची साक्ष देत होते.

हातातील बंदुका सावरत आम्ही त्या रूमकडे निघालो. ती रेस्टरूम होती. हॉलमधील लाईटच्या उजेडात त्या रेस्टरूमचा उघडा असणारा दरवाजा दिसत होता. पण दरवाज्याच्या आत मात्र अंधार होता.. गडद , फसवा अंधार!

आम्ही तिघेही त्या रूमच्या दरवाज्यात पोहचलो होतो. माझ्या एका हातात टॉर्च होती. दुसऱ्या हातात रिव्हॉल्वर होता.

त्या रूममधून मला आवाज आल्याचे भास होत होते. कोणीतरी आत कुजबुजत आहे असे वाटत होते. अंधारलेल्या दरवाज्यात उभे राहून सर्व बाजूंनी मी टॉर्चचा उजेड रूममध्ये फिरवला. सुरूवातीला मला काहीही दिसले नाही. कदाचित हॉलमधील प्रकाशित भागातून अंधाऱ्या खोलीमध्ये पाहिल्याने तसे झाले असेल पण रूमच्या आतील अंधाराला डोळे सरावल्यानंतर, टॉर्चच्या उजेडात समोरचे दृश्य पाहिल्यावर माझ्या पायाखालची जमीन सरकली.

मुरलीधर सावकाराने गळफास घेतला होता. त्याचे डोळे सताड उघडे होते. डोळ्यात भय दिसत होते.. भिती होती. त्याची जीभ तोंडाच्या बाहेर पडली होती. त्याच्या चेहऱ्याकडे बघितल्यावर भीतीने काळीज घशात येत का काय? असे झाले होते. माझ्या मागे आलेला सुरेश समोरचे दृश्य पाहून जागेवर गडबडला होता. डोळे विस्फारून आम्ही ते भयानक दृश्य पाहत होतो.

विशेष म्हणजे ज्या रूममध्ये आठवड्यापूर्वी संतोषने आत्महत्या केली होती. त्याच रूममध्ये मुरलीधरने आत्महत्या केली होती.

सावकार बंगल्यात हा तिसरा मृत्यू झाला होता.

***********

बंगल्याच्या बाहेर असणाऱ्या अंगणात डेड बॉडी ठेवली होती. मुरलीधरची बायको किरण धाय मोकलून रडत होती.

तिच्या बाजूला बसलेली अनिता (घरात काम करणारी नोकर) तिला धीर देत होती. आजूबाजूला गावातील बरेच लोक जमले होते. मध्यरात्रीची वेळ असल्याने मशाली आणि टेंभे यांच्या उजेडात अंत्यविधीची तयारी करण्याचे काम चालू होते.

" डेड बॉडीचे पोस्ट मोर्टम करावे लागेल." मी हाताची घडी घालून बाजूला उभ्या असलेल्या आबाला सांगत होतो. मी मोठ्या आवाजात म्हणालो.

" सायब तुम्ही असे करू नगा.. लोक नाहीत ऐकणार.. आजच्या रात्रीच कलेवर (मृतदेह) जाळाव लागेल. गावची रीत हाय..." दोन्ही हात जोडून आबा कळवळीने म्हणाला.

" अहो पोलीस पाटील (आबा) असे काय करताय? शासकीय नियमाने जे काही असते तेच आपण करत आहोत ना! डेड बॉडीचे पोस्ट मोर्टम झाल्याशिवाय आपण नातेवाईकांना डेड बॉडी देत नाहीत." माझ्या स्पष्टीकरणाने जवळ उभारलेले गावकरी माझ्याकडे विचित्र नजरेने पाहत होते. त्यांच्या नजरेत घृणा होती, संशय होता. सर्वजण कुजबुज करू लागले होते.

" सर, इथून तालुक्याच्या ठिकाणी मध्यरात्री डेड बॉडी घेऊन जाणे शक्य नाही. सगळा जंगलाचा दुर्गम भाग आहे हा. रस्ता चांगला नाही. रस्त्यात हिंस्र प्राणी दबा धरून बसलेले असतात..

दुसरे या गावाची रीत आहे मृत पावलेल्या शरीरास चार – पाच तासात चितेवर ठेवण्यात यावे..आणि गावाच्या नियमात बसून आपण पोस्ट मॉर्टम करून वापस नाहीत येऊ शकत." रवी समोर येऊन, मला समजावून सांगत होता. गावातील नियम सांगत होता.

मला रवीचा प्रचंड राग आला होता. या भागातला आहे म्हणून याने काहीपण सांगावे आणि मी ते ऐकावे असे कसे होईल?

" रवी मला वाटत तू शासकीय नियमात अडथळे आणत आहेस.." स्वतः वर ताबा ठेवत मी त्याला बोलत होतो. तरी पण मनात त्याच्यावर प्रचंड राग धुमसत होता.

" सर तुम्हाला जे काही करायचे असेल ते करा. त्याला माझी ना नाही.. पण एकवेळ मोठ्या साहेबाला फोन करून तुम्ही विचारा.." रवीने माझ्या मनाला पटणारी एकमेव गोष्ट सांगितली.

रवीचा विचार मला पटला. शिंदे साहेबांना फोन करून विचारावे आणि त्यांचा जो काही सल्ला असेल त्याप्रमाणे करायचे ठरवले गेले. आजूबाजूला उभारलेल्या लोकांमध्ये चुळबुळ वाढली होती. त्यांच्या तिखट नजरा मला डाचत होत्या.

शिंदे साहेबांना मी फोन केला. मध्यरात्री फोन केला त्यामुळ रागावतील, ओरडतील म्हणून मी थोडा बिचकत होतो. पण माझ्या समोर असणारे संकट त्यांच्या

ओरडण्यापेक्षा, रागवण्यापेक्षा मोठे होते. मी त्यांना कॉल केला आणि सगळी परिस्थिती त्यांच्यासमोर विशद केली.

थोडा वेळ थांबून त्यांनी बोलायला सुरूवात केली. त्यांच्या आवाजात एक त्रासिकपणा होता.

" त्या व्यक्तीने फाशीच घेतली आहे ना? तर मग पोस्ट मोर्टमच्या रिपोर्टमधून काय निष्पन्न होईल? त्यापेक्षा असे करा जे काही गावकरी म्हणत आहेत तसे करा.. "

" अहो सर पण हे कायद्याने नाही होणार... "

" कृष्णा तू मला कायदा शिकवू नकोस.. आता जर मी तुम्हाला डेड बॉडी इकडे घेऊन या म्हणलो तर गावकरी तुमच्या डेड बॉडी देखील दुसऱ्या दिवशी आम्हाला दिसू देणार नाहीत.. इकडे प्रथा, परंपरा हाच कायदा आहे..त्यामुळे जास्त डोक लावू नकोस.. कॉन्स्टेबल सुरेश आणि रवी काय तुला सूचना देतात त्या पद्धतीने काम होऊ दे.. अंडरस्टँड?" फोन कट केल्याचा आवाज आला..

मी हैराण आणि उदास होऊन मोबाईलकडे पाहू लागलो. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार मी गावकऱ्यांना प्रेताचे दहन करण्याची परवानगी दिली.

*************

चितेला आग देऊन आम्ही चौकीवर परतलो. पहाटेचे तीन वाजले होते. मध्यभागी ठेवलेला टेबल आम्ही बाजूला एका कोपऱ्यात ढकलला. खुर्च्या एकात एक घालून, त्यांना टेबलाच्या बाजूला ठेवून सुरेशने चटई अंथरली आणि आम्ही त्यावर निजलो. मी डोळे मिटून घेतले होते. मनात विचार खेळत होते.

'गावात भयाचे वातावरण निर्माण झाले होते. सावकार यांचा वाडा सर्वांच्या चर्चेचा केंद्रबिंदू झाला होता. जो तो तिथं भुताचा वास असल्याचा खाजगीत बोलत होता. घटनाही तशाच घडत होत्या.

'सर्वात आधी मृत्यू झाला संतोषचा , त्यानंतर त्यांच्या घरातील नोकराचा आणि आता स्वतः संतोषच्या भावाचा.

संतोष आणि त्याच्या भावाने दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्या होत्या. त्याही एकाच रूममध्ये!

त्या नोकरचा मृतदेह मात्र बागेत मिळाला होता.

नक्की काय घडत आहे इथे? सगळे गाव भयाने पछाडले आहे. सगळे जण हे कृत्य संतोषचे भूत करत आहे असे म्हणत आहे.. पण खरच इथे भूत आहे का?

मला कधीकधी रवीवर पण डाऊट येत होता. शिंदे साहेबांना फोन करा आणि जे गावकरी म्हणत आहेत ते ऐका असे फोर्सने रवीच मला सांगत होता. आताही तो

मध्यरात्री कुठेतरी गेला होता. कधी चौकीत येईल काय माहीत? एखाद्या दिवशी चुकीत घावला की मग रवीला सांगतो मी काय चीज आहे ते.

विचाराचे चक्र डोक्यात घुमत होते. परिस्थिती हातातून निसटून चालली होती. प्रकरण आणखी गुंतागुंतीचे होत होते.

काहीही झाले तरी बंगल्यात राहणाऱ्या सर्वांना त्या बंगल्यातून बाहेर काढणे गरजेचे होते. उद्या त्या बंगल्यात राहणाऱ्या सर्वांचे समुपदेशन करून त्या बंगल्यापासून त्यांना दूर घालवणे गरजेचे होते.

मी उद्याची वाट पाहत होतो. निद्रादेवी अलगदपणे डोळ्यांवर झोपेची चादर ओढत होती. तेवढ्यात, बाहेर गेलेला रवी तिथं चौकीत आला. माझी आणि त्याची नजरानजर झाली. त्याने त्याची नजर पटकन खाली जमिनीकडे केली. मी त्याला काहीच बोललो नाही. तो त्याच्या रोजच्या जागी अंथरूणावर जाऊन पडला. मी ही विचार करतच झोपेच्या अधीन झालो.

*****************

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही तिघे बंगल्याच्या बाहेर अंगणात उभे होतो. आजूबाजूला सगळीकडे शुकशुकाट होता. मनात विचारांचे काहूर माजले होते.

कालच्या रात्री अंत्यविधीची तयारी करताना जमिनीवर राहून गेलेले सामान तिथं अंगणात दिसत होते.

मुरलीधर सावकार याने आत्महत्या केली होती. ज्यावेळी भेटला होता त्यावेळी किती मग्रुरीत वागत होता. त्याचे समोरच्या व्यक्तीला मोजकेच बोलणे, ऐटीत वागणे मनाला खटकत होते. आणि... आणि एवढ्या मोठ्या संपतीचे मालक असणारा व्यक्ती खरच आत्महत्या करतोय? कशाला करेल तो आत्महत्या? मनात संशय निर्माण व्हायला जागा होती. मुरलीधरचा लहान भाऊ संतोषने देखील आत्महत्याच केली होती. आणि त्यानंतर आठवड्याच्या आत – बाहेर त्याच्या भावाने (मुरलीधरने) आत्महत्या केली होती. पण? का? कशामुळे? हे प्रश्न शिल्लक राहत होते!

विचार करून – करून डोक्याला मुंग्या येत होत्या. कोणीतरी हे सगळे खून करून या आत्महत्या आहेत असे दाखवत आहे का? काल रात्री , काल रात्री मुरलीधरच्या डेड बॉडीचे पोस्ट मोर्टम करू दिले असते तर कदाचित आणखी काहीतरी नवीन माहिती मिळाली असती... पण गावकऱ्यांनी पोस्ट मॉर्टम करू दिले नाही.

पोस्ट मॉर्टम करण्याच्या विरोधात अख्खे गाव होते आणि त्यात पोलिस पाटील आबा आणि कॉन्स्टेबल रवी यांचा देखील समावेश होता.

पोलिस पाटील आबा यांना संतोषबद्दल प्रश्न विचारला तर ते भीतीने घाबरतात.. आणि रवी अधूनमधून अचानक कुठेतरी निघून जातो.. अचानक बैठकीतून गायब होतो. पण कुठे जातो तो? त्याला विचारले तर काहीच सांगत नाही..

दोन्ही भावांना आत्महत्या करायची काहीच गरज नव्हती. मग त्यांनी आत्महत्या का केल्या? आणि ..आणि बागेत मृत पावलेला नोकर? तो कसा मृत पावला?

म्हणजे या घरात नक्कीच एखादे भूत , पिशाच्च, हडळ राहत आहे का? आणि तेच सगळे खून घडवत आहे का?

विचार करतच मी मुख्य दाराची बेल वाजवली. थोड्यावेळाने आतून लॉक काढल्याचा आवाज आला.

घरात काम करणारी महिला, अनिताने दरवाजा उघडला होता. आम्हाला पाहून तिला आश्चर्य वाटले होते. तिचे डोळे रडून रडून सुजले होते. लाल झाले होते. दुःखी, उदास मनाने तिने आम्हाला हॉलमध्ये बसायला सांगितले.

मी सोफ्यावरून उठून सगळया हॉलचे निरीक्षण करू लागलो. हॉलमध्ये सोफ्याच्या समोर शोकेसमध्ये टीव्ही होता. शोकेसच्या डाव्या बाजूला मोठे मोठे फोटो होते. त्यातील काही जुन्या काळातील पेंटिंग होत्या. मी जवळून त्या निरखून पाहत होतो. त्या फोटोतील केवळ मुरलीधरचा फोटो मी ओळखू शकलो जो काल दुर्दैवाने मरण पावला होता.

हॉलमधून आतल्या पॅसेजमध्ये जायला रस्ता होता. आणि त्याच रस्त्याने ज्या रूममध्ये कालच्या रात्री मुरलीधरने आत्महत्या केली होती त्या रूममध्ये मी प्रवेश केला. सुरेश आणि रवी बाहेरच सोफ्यावर बसले होते.

आतमध्ये अंधार होता. मी दरवाज्याच्या बाजूला असलेले लाईटचे पॅनल शोधले आणि खटाखट बटण दाबले. रूम दिव्याच्या प्रकाशाने उजळून निघाली.

सगळ्या रूमचे मी निरीक्षण करू लागलो. मुरलीधरने जिथे फास घेतला होता त्या जागेचे पुन्हा एकवेळ मी निरीक्षण करू लागलो. वर चढण्यासाठी वापरण्यात आलेला स्टूल पाहू लागलो. बाजूलाच कॉट होता. त्यावर असणाऱ्या चादरीवर रक्ताचे डाग दिसत होते. त्या रूममध्ये एक वेगळाच कुबट वास येत होता. त्या वासाने ओकारी येते का काय असे मला झाले होते. नाकाला रुमाल लावून मी पुन्हा माझ्या शोधावर लक्ष केंद्रित केले. निरीक्षण करताना अचानकपणे मला एक चकाकणारी पिवळ्या रंगाची छोटी वस्तू बेडच्या समोरच्या पायापाशी दिसली.

" काय शोधत आहात चोरासारखे आमच्या घरात?" एक भारदस्त आवाज आला. मला तो आवाज अस्वस्थ करून गेला. बेडच्या खाली मिळालेली वस्तू मी माझ्या उजव्या हाताच्या मुठीत धरली होती आणि पटकन मी उठून उभा राहिलो.

मी चमकून पाठीमागे बघितले. तर एक पंचवीस – तिशीतील युवती दरवाज्यात हाताची घडी घालून उभी होती. तिचे मोकळे सोडलेले केस हवेने भुरभुर उडत होते. पाणीदार डोळे, सरळ नाक आणि लाल – गुलाबी रंगाचे गाल मनाला

घायाळ करत होते. ओठांवर पिंक कलरची लिपस्टिक तिने लावली होती. मी त्या सुंदर रूपाकडे पाहतच राहिलो होतो..

" ओ, मिस्टर कान बहिरे आहेत का? काय बोलत आहे मी?" बोटांची चुटकी वाजवत, पुन्हा ती ओरडली. तिच्या आवाजाने मी भानावर आलो.

" मीsss, मीssकाल झालेल्या आत्महत्येचा तपास करत होतो." मी तिच्या धारदार नजरेने आणि तितक्याच तिखट शब्दांनी गडबडून गेलो होतो.

" व्हॉट डू यू मिन? कोण आहात तुम्ही? आणि कसला तपास करत आहात माझ्या घराचा? आणि तुम्हाला माझ्या प्रॉपर्टीमध्ये आत येण्याची कोणी परवानगी दिली?" पुन्हा तोच समोरच्याला घाबरवून टाकणारा आवाज.

" मीss, मी पोलीस आहे.. आणि इथे तुमच्या घरात घडलेल्या आत्महत्यांचा तपास माझ्याकडे देण्यात आला आहे...आणि त्याच तपासासाठी मी इथे उपस्थित आहे.." माझ्या उत्तराने ती थोडी गडबडून गेली होती.

पोलिस हा शब्द ऐकताच तिच्या डोळयात उसळलेला संताप जाऊन त्या ठिकाणी आश्चर्य आणि भीती उमटली होती.

" तुम्ही कोण?" मी त्या सुंदर युवतीला प्रश्न विचारत त्या रूमच्या बाहेर आलो. मी दारातून बाहेर येताना ती युवती दरवाज्यातून बाजूला सरकली.

" मी...मी संतोष सावकार याची वाइफ.." तिने मला न्याहाळत उत्तर दिले.

मी हॉलमधील सोफ्यावर जाऊन बसलो. तिच्याकडे एकटक पाहत मी तिला पुढे बोलू लागलो... तिची प्रत्येक हालचाल लक्ष वेधून घेणारी होती. निळी जीन्स पँट, आणि रेड कलरचा टॉप तिने घातला होता. त्या ड्रेसमधून ती आणखी मोहक आणि आकर्षक दिसत होती.

" तुम्ही काल दिसला नाहीत.." मी स्वतः च्या भावनांवर नियंत्रण ठेवत तिला बोलू लागलो. सुरेश माझ्या बाजूलाच बसला होता.

" मीss , मी माझ्या मॉमकडे शहरात गेले होते." तिने तुटकपणे उत्तर दिले.

" काल तुमच्या घरातील सदस्याने आत्महत्या केली. इथे घरावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना तुम्ही का आला नाहीत?" माझ्या प्रश्नात थोडा सात्विक संताप होता.

" मलाच जर उशिरा माहिती मिळाली असेल तर मी काय करणार? मला इथे काय घडले आहे हे जर कोणी सांगितले नाही तर मी कसे येऊ? वेल, सर तुम्हाला जी काही चौकशी करायची असेल ती करा पण सुरूवातीला संपूर्ण माहिती घेऊनच मग दुसऱ्यावर आरोप करा.. समजले." मला ती सरळ सरळ धमकी देत होती. नाराज होऊन ती घरात आतल्या बाजूला गेली.

मी आत जाणाऱ्या संतोषच्या बायकोकडे हॉलमधून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघतच राहिलो होतो.

" ही बाई मोठी फटकळ आहे सर.. कोणाशीही हिचे पटत नाही.. नेहमी चिडचिड करत असते. " सुरेश मला हळूच कानात कुजबुजत माहिती देत म्हणाला.

"आता आपण काय करायचे सर?" सुरेश पुढे काय करायचे? विचारत होता.

माझ्या हातात आलेल्या त्या पिवळया रंगाच्या वस्तूला मी खिशात ठेवले होते. एकवेळ खिशात हात घालून बोटाने त्या छोट्या वस्तूला खेळवत सुरेशला प्रत्यूत्तर देत मी म्हणालो," आणखी ठरवले नाही आणि ..आणि रवी कुठे गेला आहे?" सुरेशच्या बाजूला बसलेला रवी तिथं दिसत नाही म्हणून काळजीने मी त्याला विचारले.

" माहीत नाही सर..तो कुठे गेला ते?" सुरेशने मान खाली घालून उत्तर दिले.

माझ्या अंगाचा तिळपापड झाला होता. रवीचे मुर्खासारखे वागणे मला अजिबात पसंत पडत नव्हते.. आता भेटल्यावर त्याला चांगलाच जाब मी विचारणार होतो..

ज्या कामासाठी आज आम्ही बंगल्यावर गेलो होतो ते काम मात्र अपूर्णच राहीले होते. तपास पूर्ण होईपर्यंत कोणीही बंगल्यावर राहू नका हे तिथल्या लोकांना सांगायचे राहूनच गेले होते. मी कामच्या गडबडीत विसरून गेलो होतो.

**************

वेळ दुपारची होती. किर्र उन्हाने अंगांची लाही होत होती. सावकार यांच्या बंगल्याकडून पायवाटेने परत चौकीकडे आम्ही निघालो होतो. चालताना, चौकीकडे येताना मनात रवीचाच विचार घुमत होता.

किती नालायक आणि मूर्ख आहे रवी. न विचारता, न काही सांगता हा कुठे गेला? आणि हा नेहमी कुठे जातो? मला रवीचा प्रचंड राग येत होता.

माझ्या पाठीमागे सुरेश चालत होता. त्यालाही विचारून काही फायदा नव्हता. कारण तो ही रवी कुठे गेला आहे हे कधीही मला सांगणार नव्हता. मला आता वाटत होते की या दोघांची वर शिंदे साहेबांकडे कंप्लेंट करावी. एकवेळ वरून कान टोचले की मग होतील सरळ सुतासारखे..

" ओ सायब? राम राम.." आबा पाटील समोरून येत होता.

त्याला मी ही नमस्कार घातला. त्याच्या सोबत आणखी एक युवक होता. त्या युवकाला आतापर्यंत मी कधीही पाहीले नव्हते.

" बोला पोलिस पाटील.. काय म्हणता? आणि इकडे कुठे आलात? बंगल्याकडे निघालात का? काही काम होते का तिकडे? " मी वरवर तर सहज विचारले होते. पण माझ्या मनात या आबाबद्दल पण शंकाच होती, संशय होता..

" थोड काम होत बंगल्यावर.." आबा डोळे मिचकावत म्हणाला. काय काम होते ते मात्र त्याने सांगितले नाही.

" आणि हा कोण?" आबा सोबत असलेल्या त्या दणकट यवुकाकडे पाहून मी विचारले.

" हा जब्या हाय... बंगल्यावर काम करणाऱ्या रामूचा चुलत भाऊ.." आबाने माहिती दिली.

तो जब्या वेगळ्याच नजरेने आमच्याकडं बघत होता. त्याच्या डोळयांवरच्या दाट भुवया आक्रसून गेल्या होत्या.

त्याच्या खांद्याला एक झोळी लटकवलेली होती. डोक्याला त्याने रूमाल बांधला असला तरी त्याचे केस खांद्यापर्यंत खाली रूळत होते. उघड्या दंडावर भस्माचे पट्टे होते. दोन्ही हातात मनगटावर पांढऱ्या – लाल मण्यांच्या छोट्या दोरा/माळा त्याने घातल्या होत्या. दाढी – मिशा वाढवलेल्या होत्या. खांद्यावर एक मोठा गमछा होता. पहिल्याच भेटीत जब्याबाबत माझे मत तितके चांगले झाले नव्हते.

" सायबsssमाझं ऐकता का? इथ , या गावात थांबू नका आता..लय वंगाळ हाय त्यो बंगला..आणि त्या बंगल्याचा जुना मालक.. इथून निघून जा.. लवकर निघून जा..." नाकपुड्या मोठ्या करत, जोरात श्वास घेत तो धिप्पाड जब्या बोलत होता. त्याचे शब्द कानात घुमत होते. मी त्याला काहीही प्रत्युत्तर दिले नाही.

पोलिस पाटील आबा मात्र काही न बोलताच पुढे जाऊ लागला. जब्या आणि पोलिस पाटील दोघेही सावकाराच्या बंगल्याकडे निघून गेले. माझ्या मनात मात्र त्या जब्याने अनेक प्रश्न निर्माण केले होते आणि पोलिस पाटीलबाबत मनात निर्माण झालेला संशय आणखी वाढला होता.

तो जब्या आम्हाला चक्क इथून जा म्हणत होता. का? का तर म्हणे बंगल्याचा जुना मालक सगळयांचा जीव घेत आहे.. आणि ह्या बंगल्याचा जुना मालक कोण? तर तो धरमराव सावकार! आणि तो तर जिवंत नाहीये ना? मग तो कसे जीव घेत आहे लोकांचे? आता पर्यंत संतोष लोकांचे जीव घेत होता मग अचानक हा जुना मालक कुठून मध्येच उपटला?

" सुरेश कोण आहे हा जब्या? एखादा मांत्रिक आहे का? भूत पिशाच्च यांचा जाणकार आहे का?" मी खाली मान घालून माझ्या पाठीमागून चालणाऱ्या आणि विचारमग्न झालेल्या सुरेशला विचारले.

" त्याचे नाव मोठे हाय या गावात सर.. लोकांच्या अंगात शिरलेली भूत, हडळ , बहिरवसा हा काढून देतो. जब्या गावाचा मोठा मांत्रिकच हाय.." सुरेश माहिती देत होता.

" असं? तर मग त्या बंगल्यात शिरलेले धरमरावचे / संतोषचे भूत काढ म्हणावं त्याला बाहेर.." मी त्याची खिल्ली उडवत म्हणालो.

" सर कदाचित तुमचा विश्वास नसेल भुताखेतावर पण आमचा आहे.." सुरेश खिन्न मनाने एवढे बोलून पुढे जवळ आलेल्या चौकीकडे निघून गेला. मी त्याच्या मागे गेलो.

खेडेगावात या भूतांच्या कथा खूपच चवीने चघळल्या जातात.. पण मी मात्र असल्या थोतांड गोष्टीवर विश्वास ठेवायला अजिबात तयार नव्हतो. पण? त्याचवेळी असल्या भुताखेतावर विश्वास ठेवायची पाळी आजच्या रात्रीच माझ्यावर येणार होती.

रात्री आम्ही उशिरा झोपायच्या तयारीला लागलो होतो. रवी कधी सकाळी त्या बंगल्यातून बाहेर पडला होता तो आणखी वापस आला नव्हता. कुठे गेला होता काय माहीत? त्याच्यावर असणारा माझा राग आता काळजीत बदलला होता. सकाळी तो कुठे बाहेर गेला होता ते कळलेच नाही.

त्याचा फोन ही लागत नव्हता. कुठे गेला होता तो? आम्ही उशिरा रात्रीपर्यंत त्याची वाट बघत बसलो होतो. आज दिवसभरात घडलेल्या घटना डोळयांच्या समोरून भरभर निघून जात होत्या. खिडकीच्या समोर ठेवलेल्या खुर्चीवर बसून मी विचारमग्न झालो होतो.

सकाळी ज्या खोलीत मुरलीधर सावकारने आत्महत्या केली होती त्या खोलीत कॉट खाली सापडलेल्या त्या एका वस्तू भोवती माझे मन पुन्हा एकवेळ केंद्रित झाले होते.

त्या खोलीत फणफण करत आलेली संतोषची बायको. किती सुंदर दिसत होती ती नाही? जसे लोक म्हणायचे अगदी तशीच सुंदर होती. काही क्षण मला तिच्या रूपाने भुरळ घातली होती. पण बरीच अहंकारी वाटली मला. तिच्या बोलण्याची, उद्धटपणाची भाषा अजिबात आवडली नाही.

आणि तिचा मोठा दीर वारला आहे याचे तिला अजिबात दुःख नव्हते. हांss काय लोक राहतात या जगात..? किती स्वार्थी आणि आपमतलबी? माझी प्रियसी शितल याच पठडीतली होती.. स्वतः च्या स्वार्थापलीकडे तिला तरी कुठे काही दिसत होते का?

रवीची वाट बघून आम्ही झोपू लागलो होतो. विचारांची गर्दी मनात होतीच. ती काही केल्या कमी होत नव्हती. रात्र सरत होती. आम्ही दिवसभर चालल्याने पायाला गोळे आले होते. शरीर थकल्याने झोप येऊ लागली होती.

सुरेश तर केव्हाचा झोपी गेला होता. मी मात्र झोप येण्यासाठी तळमळत होतो... काय झालं होत कुणास ठाऊक पण मला झोपच येत नव्हती. मन अस्वस्थ झाले होते.

रात्री एक वाजताची वेळ असेल. अचानक काहीतरी वाजल्याने मला जाग आली होती. मला वाटले रवी आला आहे. म्हणून मी चमकून दरवाज्याकडे पाहीले पण दरवाजा बंद होता. मोठा सुस्कारा सोडत मी डोळे मिटून घेतले आणि विचार करत होतो, हा रवी कुठे गेला असेल?

खूडssखूडsssआवाज आला. मी आवाज कुठल्या दिशेने आला असेल याचा शून्य मिनिटात अंदाज बांधला आणि माझे लक्ष डावीकडे असणाऱ्या खिडकीकडे गेले. खिडकी बंदच होती. पण खिडकीच्या पांढऱ्या, दुधाळी रंगाच्या काचेत बाहेरच्या बाजूने कोणाचीतरी सावली उमटली होती. काळया रंगाची ती सावली. जी आमच्याकडे पाहण्याचा प्रयत्न करत होती. कदाचित आत येण्याचा प्रयत्न करत होती.

तिच्या गुरगुरण्याचा, फिस्कारण्याचा आवाज येत होता. मी माझ्या झोपलेल्या जागेवरूनच ते खिडकीतील दृश्य श्वास रोखून पाहत होतो. पुन्हा खिडकीवर नखं खरवडण्याचा आवाज येऊ लागला होता. जो मला अत्यंत भयानक आणि किळसवाणा वाटत होता.

मनात जे नाही ते विचार जन्म घेत होते. काय आहे बाहेर? एखादा सैतान? एखादे भूत? ते जर आत आले तर? आमच्याकडे बंदुकीशिवाय स्वतः चे संरक्षण करायला काहीच नव्हते..आणि अश्या भूतांना सामान्य बंदुकीने काय होणार होते? याचा सामना कसा करायचा? मनाची धडधड वाढली होती. त्या सावलीकडे बघून काळजात धस्स होत होते. बाजूला सुरेश घोरत पडला होता.

सुरेशला उठवायला जावे आणि उठल्यावर त्याने बाहेर उभी सावली पाहिल्यावर तो मोठ - मोठ्याने बोंबलला , ओरडला तर तो बाहेर उभा सैतान आमच्यावर झडप घालेल. त्यामुळे सुरेशला उठवायच्या भानगडीत मी पडलो नाही.

थोडावेळ स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न मी करत होतो. हळूच डोळे उघडून खिडकीकडे मी पाहिले तिथं आता कोणी नव्हते. केवळ बाहेर वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज येत होता.

मी सुटकेचा निःश्वास टाकला. आणि तितक्यात समोरचा दरवाजा वाजू लागला. थाडथाडss – धाडधाडsssआवाज येऊ लागला.

त्या आवाजाने गर्भगळीत होऊन मी दरवाज्याकडे पाहत होतो. उघडायचा का नको या विवंचनेत असताना अचानक दरवाजा वाजायचा थांबला. पुन्हा थोड्यावेळाने आणखी दरवाजा वाजू लागला. मी भयंकर घाबरलो होतो. थाडथाड, थाडथाडsssपुन्हा आवाज बंद झाला.

कदाचित रवी तर चौकीच्या बाहेर येऊन मुद्दामहून तसे करत नसेल ना? मनात शंका आली. पण माझ्यात उठून दरवाजा उघडण्याचे धैर्य होत नव्हतं.

असा प्रकार माझ्या आयुष्यात यापूर्वी कधीही घडला नव्हता.

लहानपणी भुताखेताच्या गोष्टी ऐकून होतो त्या आता आठवू लागल्या. काळाच्या ओघात मनाच्या पटलावरून नष्ट झालेल्या गोष्टी पुन्हा मनाच्या पटलावर त्यांचा खेळ खेळू लागल्या होत्या. सकाळी त्या जब्याने सांगितलेले एकेक वाक्य मला आठवू लागले होते. इथे थांबू नका.. इथून निघून जा... निघून जा इथूनsss..

दरवाजा वाजायचे आता बंद झाले होते. मी अंथरूणावर तसाच पडून होतो. बाजूला उशीखाली ठेवलेला पिस्तूल मी हातात घेतला होता. हळूच उठून मी दरवाज्याच्या दिशेने पुढे पुढे जाऊ लागलो. माझे अंग हळुवारपणे थरथर कापत होते.

मी घाबरलेल्या मनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत होतो. चेहरा घामेजुन गेला होता. डोळ्यात भिती होती. हळूहळू मन हे मान्य करत होते.. इथे सगळेच काही मानवी नाही.. काही अमानवीय शक्ती इथे आहेत.. आणि त्याचमुळे इथे खून पडत आहेत.. लोक मरण पावत आहेत... मी विचार करतच दरवाज्याच्या जवळ पोहचलो.

हळूच आतील कडी काढली आणि एकदम दरवाजा उघडून बाहेर पाहीले.. पण बाहेर कोणीच नव्हते. मी थोडावेळ थांबून पुन्हा खोलीत आलो.. एकवेळ खिडकी आणि दरवाजा यांच्याबाहेर बारकाईने पाहिले. पण आता तिथं कोणीच नव्हते.

रात्री मला केव्हा झोप लागली कळले नाही. पण झोपेत देखील भयानक चेहरे माझ्या नजरेसमोर नाचत होते. एकवेळ तर मुरलीधर सावकाराचा सुजलेला चेहरा माझ्या नजरेसमोर येऊन नाचायला लागला.

संपूर्ण रात्र मी कशीबशी अर्ध झोपलेल्या अवस्थेत काढली. मनात शेवटपर्यंत भिती होतीच की बाहेर कोणीतरी उभे आहे.. दरवाज्याच्या लहान फटीतून माझ्याकडे रागाने कोणीतरी पाहत आहे..

सकाळ झाली. सगळा अंधकार नाहीसा झाला होता. मी लगबगीने उठलो आणि बाहेर आलो. दरवाजा उघडून बाहेर येऊन मी कालच्या रात्रीच्या सैतानाच्या काही खाणाखुणा मला दिसतात का? ते पाहत होतो. पण रात्रीच्या कुठल्याही खुणा, कसलेही ठसे मला दिसले नाहीत. मी आश्चर्याने थक्क झालो होतो.

मी पुन्हा खिडकीपाशी खाली चेक केले. तर खालच्या फरशीवर काहीच खुणा नव्हत्या. खिडकीच्या काचेला त्याने खरवडले होते. तिथं बारकाईने पाहिले पण तिथंही काहीच नव्हते.

मी निराश झालो होतो. मी स्वप्नात होतो का? मी सुरेशला उठवले आणि आम्ही रोजच्या सकाळच्या तयारीला लागलो. तेवढ्यात आबा पाटील धडपडत तिथ चौकीत आला.

" सायबss, सायब चलाssलवकर..." आबा पाटील सकाळी - सकाळी धावत पळत चौकीत आला होता. तो घाबरलेला होता. त्याच्या चेहऱ्यावरून घामाच्या धारा वाहत होत्या.

" कुठे चला?" गोंधळून सुरेशने विचारले.

" रवी सायब तिथं हाय... तिथं हाय..." आवंढा गिळत आबा बोलत होता.

" तिथं हाय? तिथं हाय म्हणजे? कुठे?" मी पुढे होऊन आबाला विचारले. कालपासून बेपत्ता झालेला रवी सापडला होता. त्याचा कोण आनंद मला झाला होता.

" तिथं , तिथ गावातल्या वडाच्या झाडाला त्याने फास घेतलाय..." आबा पाटील एका दमात बोलून गेला.

**************

रवीने आत्महत्या केली होती. पण का? कशासाठी? त्याने आत्महत्या करावी असे तर काही कारण घडले नव्हते. एकदम मस्त मौला माणूस होता. रवी कुठल्याही कारणासाठी आत्महत्या करणारा नव्हता. आणि ... आणि रात्री कोण आले होते चौकीत? काहीतरी भयानक होते ते. एखादे हिंस्र जनावर असल्याचा मला भास झाला होता. आणि... आणि त्यानेच मारले असेल का रवीला? खरच या गावात राहणे म्हणजे मूर्खपणा आहे. असे मला आता वाटू लागले होते.

मी आमचे वरिष्ट अधिकारी शिंदे साहेबांना फोन करून सगळी परिस्थिती सांगितली. रवीच्या बॉडीचे पोस्ट मोर्टम करा म्हणून त्यांना विनवणी केली आणि मगच त्याला त्याच्या घरच्यांच्या हवाली करा असे सांगितले. रवीचे गाव तिथ जवळच होते.

सगळे गाव भयचकित झाले होते. त्या सावकार यांच्या बंगल्यात असणारे भूत या हत्या करत आहे यावर लोकांचा आता ठाम विश्वास झाला होता. आणि माझाही आता विचार बदलत होता.

***************

मी आणि सुरेश चौकीत बसलो होतो. खिन्न मनाने, उदास अवस्थेत मी विचार करत होतो.

' तो मांत्रिक जब्या का काय? कसा बोलत होता. इथे राहू नका..त्या बंगल्याचा जुना मालक तुम्हाला सोडणार नाही.'

मग तो जब्या म्हणत आहे त्यानुसार तर मग धरमराव हाच सगळे खून करत आहे का काय?

पण धरमराव मरून तर बरीच वर्षे लोटली...आणि आताच त्याला जिवंत व्हायला काय झालं? कोणी केले जिवंत त्याला? की पुण्याहून मी येणार आहे या गावात तपास करायला म्हणून त्या मेलेल्या धरमरावला कळले का काय? आणि झटकन जिवंत झाला तो धरमराव? आणि सुटला लोकांना मारत.....च्यायला, मी वैतागून पुणे सोडले, बदली झाली, वाटले होते इथे तरी चांगले आरामशीर जीवन जगता येईल पण..? इथे तर जास्तच ताप आहे.' डोक्याला हात लावून मी विचार करत बसलो होतो.

आमचा एक साथीदार आम्हाला सोडून गेला होता. रवी!

रवी काहीच दिवसांचा सोबती होता पण त्याच्यासोबत घालवलेले काही क्षण आठवत होते. रवी कशाला आम्हाला सोडून दूर गेलास तू? तू आमच्या जवळ राहिला असतास, आम्हाला सोडून गेला नसतास तर? तू उगाच आम्हाला सोडून दूर गेलास.' विचार भरकटत होते. जसा मी विचारात गुंतलो होतो अगदी तसाच सुरेश

देखील विचारात गढला होता. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. माझ्यापेक्षा रवी त्याला क्लोज होता. दोघे एकमेकांचे जिगरी फ्रेंड होते.

" सुरेश मी जे काही विचारत आहे त्याचे खरे उत्तर देशील का? रवीबद्दल तुला जेवढे माहीत आहे ते मला सांगशील का? आणि तू प्रामाणिकपणे खरे सांगितलेस तरच रवीचा खून कोणी केला आहे हे आपल्याला कळेल..?"

माझ्या अचानक विचारल्या गेलेल्या प्रश्नाने सुरेश भानावर आला. त्याच्या चेहऱ्यावर दुःख होते. त्याचे डोळे पाणावले होते.

" सर त्याला... त्याला दारूचे आणि गांजा ओढायचे व्यसन होते. त्यामुळे तो... तो आपल्यातून नेहमी अदृश्य व्हायचा..मोठ्या साहेबांना (शिंदे साहेब) त्याच्या या सवयीबद्दल माहिती होती आणि त्यांनी त्याला व्यसन सोडण्याबद्दल कडक सूचना देखील दिली होती. पण त्याला त्याचे व्यसन काही सुटत नव्हते. आणि सावकार यांच्या घरी हॉलमधून तो गायब झाला , त्यावेळी तुम्ही त्या रूममध्ये तपासणी करत होता तेव्हा तो मला थोड्यावेळात बाहेरून येतो असे सांगून बाहेर निघून गेला होता. आणि आता तर जिवानिशी तो कायमचाच गेला होता. "

सुरेश खरे बोलत आहे याची खात्री पटल्यावर मी त्याला पुढे बोलू लागलो," काल रवी कुठे कुठे गेला होता याची माहिती आपल्याला मिळवावी लागेल सुरेश. आणि तो कसाही असला तरी आपला साथीदार होता. त्याच्याशिवाय त्याचे कुटुंब

आता उघड्यावर पडले आहे. काल त्याला कोणी मारले आहे? ते आपण शोधूया..आणि त्याच्या खुनाचा बदला घेण्याचा प्रयत्न करूया..."

" अहो सर एवढ्या हत्या इथे घडल्या आहेत त्या सर्व हत्या भूतानेच केल्या आहेत ना? मग आणखी कशाला वेगळी चौकशी करायची? आणि रवी मेला आहे , जसे त्याला मारले गेले तसे आपल्यापण जिवाला धोका आहे सर..." सुरेशच्या डोळ्यात भिती दिसत होती.

" तू म्हणतोस ते ही बरोबर आहे. आपल्याही जीवाला धोका आहेच. पण जर रवीला त्या भुताने मारले असेल तर त्याला, त्या भुताला, राक्षसाला दिवसा शोधून काढायला काय अडचण आहे? दिवसा तर भूत कोणावर हल्ला करणार नाही ना? आणि आपण थोडीच त्या भुतावर हल्ला करणार आहोत? फक्त ते भूत राहते कुठे एवढे माहीत झाले तरी उद्या कुठल्यातरी मांत्रिकाकडून , स्वामींकडून त्याला जेरबंद करू या म्हणजे रवीच्याबाबत असलेला आपला बदला पुरा होईल.." सुरेशला ज्या भाषेत पटेल त्या भाषेत मी बोललो. त्याला माझा विचार पटला होता.

आम्ही दोघेही रवीच्या कालच्या सगळ्या अॅक्टिव्हिटी शोधण्यासाठी चौकीच्या बाहेर पडलो होतो.

**********

रवीला दारूचे व्यसन होते त्यामुळे आम्ही सर्वात आधी गावातील दारूच्या दुकानात गेलो. गावाच्या पूर्वेला सर्वात टोकाला, एका झोपडीवजा घरात दारू विक्री केली जात होती. तेवढे एकच दुकान गावात होते. तिथं देशी – विदेशी दारू विक्री केली जात होती.

मी आणि सुरेश त्या दुकानात शिरलो. ओकारी आणणारा वास नाकाला झोंबत होता. सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरले होते. कुडाच्या भिंती सगळ्या मावा गुटखा थुंकून थुंकून रंगवल्या होत्या. एकेठिकाणी गाण्याचा आवाज येत होता. दुनिया मे कितना गम है, मेरा गम कितना कम है...

तिथं दारू प्यायला बसण्यासाठी चार – पाच टेबल ठेवले होते. टेबलांच्या भोवती खुर्च्या होत्या, बाकडे होते.

तिथं बाजूलाच एके ठिकाणी चकना विक्री केला जात होता. चौदा – पंधरा वर्षांचा एक पोरगा तो चकना विकत होता. आजूबाजूच्या टेबलवर दारू पिणारे बसले होते. दारू पित पित कोणीतरी बडबड करत होते, कोणीतरी शिव्या देत होते. बडबड करताना त्यांची जीभ अडखळत होती. काहीजण स्वतः चा मोठेपणा सांगत होते.

त्या ठिकाणी फक्त दोघे दारू पिले नव्हते. एक दारू विकणारा आणि दुसरा दारू सोबत खायला लागणारा चकना विकणारा... दोघेही पैसे कमावत होते आणि समोर दारू पिणाऱ्या लोकांची सुरू असणारी "सर्कस" ते पाहत होते.

मी त्या चकना विकणाऱ्या मुलापाशी सरकलो. आम्ही दारू घ्यायची आहे म्हणून एक क्वार्टर घेतली होती. (पण आम्ही दोघेही दारू पिणार नव्हतो.) मी त्या पोराकडून दहा रुपयांचा चिवडा विकत घेतला. आणि त्याला पन्नास रूपयांची नोट दिली. बाकीचे चाळीस रूपये मी त्यालाच राहू दिले.

" ये बाळया, मी एक प्रश्न विचारू का? खरे उत्तर सांगायचे.." त्या नाव माहीत नसलेल्या पोराला बाळया म्हणून हाक मारली मी.

" हो सायब इचारा की, आणि माझं नाव बाळू नाही, नंदू हाय.." पन्नास रूपयांची नोट दिल्याने खुश झालेला नंदू मला आनंदात बोलू लागला होता.

" बरं, नंदू मला सांग काल कोणी काळया रंगाचे जॅकेट घातलेला, दिसायला काळा – सावळा, मिलिटरी कट मारलेला, उंच असणारा माणूस आला होता का इथे?"

नंदूने डोळे मिचकावून एकवेळ माझ्याकडं आणि एकवेळ सुरेशकडे पाहिले.

" खरं उत्तर सांगितलेस तर मग मी तुला आणखी पैसे देईल.." मी त्याला आमिष दाखवले.

थोडावेळ विचार करून, तो म्हणाला," सायब कोणत्या टायमाला (वेळेला)?" डोक्याला थोडा ताण देत, तोंडाचा चंबू करत नंदू विचारत होता.

" सकाळी दहा - साडे दहा वाजता.." सुरेश पटकन बोलून गेला.

"हाss साहेब सकाळी एकजण आला होता. तुम्ही म्हणता तसा एक व्यक्ती (वर्णनाचा) इथे आला होता पण थोडावेळ थांबून तो एका दुसऱ्या व्यक्तीसोबत इथून निघून गेला."

" दुसऱ्या व्यक्तीसोबत? कुठल्या? त्या व्यक्तीची माहिती तुला सांगता येईल का?" मी अगतिक होऊन नंदूला विचारले.

" तो थोडा जाड होता, त्याने डोक्याला गमछा सारखे काहीतरी बांधले होते. आणि तो व्यक्ती उंचही होता."

" ते दोघे कुठल्या रस्त्याने इथून निघून गेले होते?" सुरेशने त्याला विचारले.

" त्या झाडीतून जाणाऱ्या डाव्या बाजूच्या रस्त्याने ते गेले होते." नंदूने हाताचे बोट डाव्या बाजूच्या झाडीकडे दाखवत म्हणाला.

" तुला कसे काय लक्षात राहिले? ते लोक तिथूनच गेली असतील ते?" सुरेशने शंका उपस्थित केली.

" कारण सायब तो रस्ता कोणीही वापरत नाही.. फक्त गावातील लोक खूप गरज असेल तेव्हाच तो रस्ता वापरतात.." नंदू प्रामाणिकपणे सांगत होता.

" तो रस्ता पुढे कुठे जातो...?" मी विचारले. आम्ही त्या रस्त्याने जायच्या तयारीला लागलो होतो.

" सावकार यांच्या बंगल्याकडे हा रस्ता जातो." नंदूने सहज उत्तर दिले.

मी आणि सुरेश मुळापासून हादरलो होतो. म्हणजे रवी दारू पिऊन पुन्हा परत बंगल्याकडे येत होता का काय? मग तो आपल्यापर्यंत पोहचला कसा नाही? आणि त्याच्या सोबत असणारी व्यक्ती कोण होती?

जितका जास्त विचार करावा तेवढे हे प्रकरण गुंतागुंतीचे झाले होते. आम्ही दोघेही त्या रस्त्याने पुढे - पुढे जाऊ लागलो. दाट झाडीतून तो रस्ता सावकार यांच्या बंगल्याकडे जात होता. आणि आता प्रत्यक्षात आम्ही ते पाहणार होतो. दाट झाडीतून पुढे चालत असताना एका मोठ्या चिंचेच्या झाडाखाली आम्ही येऊन थांबलो होतो.

त्या मोठ्या झाडाखाली गार वाटत होते. तिथं थोडावेळ थांबून आम्ही पुढे निघालो होतो. तर तिथं झाडाच्या खाली, थोडी जमीन उकरलेली दिसत होती. थोडी प्राण्यांची झटापट झाल्यासारखे दिसत होते.

" सर, इथे प्राण्यांची झटापट झालेली दिसत आहे.. एखादे वेळी जंगली अस्वल किंवा बिबट्या इथे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिवस आणखी

थोडा वर आहे पण अंधार पडायच्या आत आपण इथून सुरक्षित ठिकाणी पोहचलो पाहिजेत. " सुरेशने जंगली हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याची शक्यता सांगितली होती.

मी हळुवारपणे खाली बसून त्या उकरलेल्या जमिनीकडे पाहू लागलो. तिथं एका झाडाच्या मुळाच्या जवळ एक वस्तू दिसली. ती तुटलेली वस्तू हळुवारपणे न्याहाळून , खिशात घालत मी उठून उभा राहिलो.

" चालायचे का मग पुढे?" सुरेशने संशयाने माझ्याकडे पाहत विचारले. जमिनीवर पडलेले काहीतरी सरांनी खिशात ठेवले आहे हे त्याने पाहिले होते पण काय ठेवले आहे हे त्याने मला विचारले नाही आणि मी ही त्याला सांगितले नाही.

" होय , चला.." हळूहळू मी आणि सुरेश दोघेही चालू लागलो. सावकार यांच्या बंगल्याच्या मागच्या बाजूने तिथ आम्ही पोहचलो होतो. सावकार यांचा समोरच्या बाजूने आकर्षक दिसणारा बंगला मागच्या बाजूने भयानक दिसत होता. रंग उडून गेलेला.. भिंतीच्या खपल्या बाहेर आलेल्या दिसत होत्या.

दिवस मावळतीकडे झुकला होता. आम्ही बंगल्याच्या मागच्या बाजूच्या बगीच्याजवळ आलो होतो. तिथं असणारी ते स्टोअर रूम (गोडाऊनची खोली) दुरूनही आमचे लक्ष वेधून घेत होती. त्या खोलीत फिक्कट रंगाचा थोडा उजेड दिसत होता.

आम्ही दोघे तिथंच खाली दबा धरून बसलो होतो. त्या खोलीत काही हालचाल होते आहे का? कोणी त्या खोलीत वावरत आहे का? आम्ही निरीक्षण करू लागलो. थोड्याच वेळात त्या खोलीत कोणाचा तरी वावर दिसू लागला.

खिडकीच्या आतून भिंतीवर सावल्या उमटू लागल्या होत्या. कोण असेल ते? मनात भीतीचा काटा उभा राहिला होता.

कोणीतरी हळूच उठून उभा राहत असल्यासारखे जाणवले.

मी आणि सुरेश दोघांनी आपापल्या बंदुका हातात धरून पुढे जायचे ठरवले. बगीच्यात जाण्यापूर्वी काटेरी कुंपणाला ओलांडून आम्हाला पुढे जावे लागले. बगीच्यात असणाऱ्या नारळाची, फुलांची, फळांची झाडे, झुडपे यांना क्रॉस करून आम्ही पुढे पुढे त्या स्टोअर रूमकडे जावू लागलो. ......

तासाभरानंतर...........

दिवस मावळला असल्याने सगळीकडे अंधारून आले होते. मी स्वतः मुरलीधर सावकार याची बायको – किरण , पोलिस पाटील आबा, घरकाम, स्वयंपाक करणारी अनिता, घरातील काम करणारे दोन्ही नोकर रामू आणि नाम्या, आणि मांत्रिक जब्या यांना बोलावून घेतले होते. सर्वांची वाट पाहत मी आणि सुरेश तिथ हॉलमध्ये सोफ्यावर बसलो होतो.

बोलावून घेतलेले सगळे जण अर्ध्या - पाऊण तासात तिथ आले होते. सगळे हॉलमध्ये जमा झाले होते. सगळयांच्या चेहऱ्यावर तणावयुक्त उत्सुकता होती. नक्की पोलिसांनी आम्हाला इथे कशाला आणि का बोलावले आहे? याबद्दल त्यांच्या मनात भिती होती.

मी, वर तालुक्याला शिंदे सरांना कॉल करून त्यांना पोलिसांची ज्यादाची कुमक घेऊन या म्हणून पाऊण तासापूर्वी सांगितले होते.

ते लवकर येतील यावर विश्वास ठेवून इथली खिंड मला लढवावी लागणार होती.

सगळे जण संशयाच्या नजरेने माझ्याकडे पाहत होते. पुन्हा एकमेकांकडे बघत होते. सर्वांना मी का बोलावून घेतले आहे हे मात्र आणखी कोणालाच माहिती नव्हते. सोफ्यावर बसलेलो मी, उठून चालत हॉलच्या मध्यभागी जाऊन उभा राहिलो. हाताची घडी घालून मी, सर्वांना सोफ्यावर बसण्यास सांगितले. (माझ्या हाताला थोड्यावेळापूर्वी बगीच्यात झालेली जखम मी समोर बसलेल्या लोकांना दिसणारा नाही अशा पद्धतीने हात लपवत होतो.)

" सायब एवढ बिगिन का ओ बोलावून घेतलं? आणखी कोणाच काही झालं नाही ना?" पोलिस पाटील आबा चेहऱ्यावर जमा झालेला घाम खांद्यावरील गमछाने (मोठा रूमाल) पुसत म्हणाला. तो गावातून थोड धावत पळत आल्याने त्याला दम लागला होता.

" आबा यावेळी कोणाचा खून झाला आहे का नाही? मी तरी कसे सांगणार तुम्हाला? ते ही आपले नशीब म्हणायचं.. आणखी एक खून होता-होता राहिला!" माझ्या कोड्यात बोलण्याने समोर बसलेले सर्वजण बुचकळ्यात पडले. मी सर्वांच्यावर एकवेळ नजर फिरवली.

" मग एवढे लवकर , आम्हाला विनाकारण का बोलावून घेतले? त्याला काही खास कारण घडले आहे का?" मुरलीधर सावकाराची बायको फटकन बोलून गेली. तिच्या बोलण्यात चीड होती. राग होता. तुम्ही आम्हाला इथे बोलावून घेऊन आमचा वेळ विनाकारण वाया घालवत आहात असा तिच्या बोलण्याचा अर्थ होता.

" संतोष सावकाराची पत्नी, रिया वहिनी कुठे आहे?" मांत्रिक जब्या एकवेळ सर्वांच्या वर नजर फिरवून, माझ्यावर नजर स्थिर करत काळजीने म्हणाला.

" त्याच रिया वहिनी कुठे आहेत याचा शोध घ्यायचा आहे आपल्याला मांत्रिक साहेब. " मी त्या मांत्रिकाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत म्हणालो.

" लवकर शोधा इन्स्पेक्टर, नाही तर तुमच्या सहकाऱ्यासारखी तिची पण हत्या घडायची." मुरलीधरची बायको, किरण एका ठसक्यात म्हणाली.

" धरमरावने हत्याकांड घडवले आहे आणि या घरातील प्रत्येक सदस्याला मी सांगतो आहे या बंगल्यातून लवकर बाहेर जा. पण माझे कोणी ऐकत नाही.." मांत्रिक जब्या दुःख व्यक्त करत म्हणाला.

’ तुझेच काय इथे माझेही कोणी ऐकत नाही...’ मी स्मित हास्य करत त्या मांत्रिकाकडे पाहत म्हणालो.

" सर्वांचे बोलून झाले असल्यास मी आता बोलू का?" सर्वांच्यावर पुन्हा एकवेळ नजर फिरवून मी विचारले. प्रत्येकाच्या डोळयांची हालचाल मला पहायची होती. कोणाच्या नजरेत भिती होती, कोणाच्या नजरेत तिरस्कार होता, तर कोणाच्या नजरेत राग होता, कोणाच्या नजरेत उत्सुकता होती.

" अहो, सायब तुम्हाला बोलायला का कोणाच्या परवानगीची गरज हाय का?" आबा पाटील पुढं म्हणाला, " बोला."

" हे सर्व खून धरमराव किंवा संतोष यांच्या भुतांनी केले नाहीत.." माझ्या बोलण्याने अपेक्षेप्रमाणे वादंग निर्माण झाले. सगळे एकमेकांकडे पाहू लागले.

" मग कोणी केले आहेत हे खून?" जब्या मांत्रिक चवताळून पुढे येत म्हणाला, " तुमचे डोक ठिकाणावर आहे ना इन्स्पेक्टर? का धरमराव घुसला तुमच्या अंगात?"

मांत्रिकाच्या बोलण्याचा मला राग आला होता पण स्वतःवर कंट्रोल ठेवत मी पुढे म्हणालो, " धरमराव त्याच्या समाधीत चीर विश्रांती घेत आहे. पण खरा खुनी आणखी खुलेआम फिरत आहे..आणि तो खरा खुनी दुसरा - तिसरा कोणी नसून तू स्वतः आहेस मांत्रिक जब्या..." मी त्या धिप्पाड मांत्रिकाकडे बोट दाखवत मोठ्याने

बोलून गेलो. त्या हॉलमध्ये एकच गलका वाढला होता. सर्वजण त्या मांत्रिकाकडे आणि माझ्याकडे पाहू लागले.

" सायब डोक हाय का तुमचं ठिकाणावर? अहो काय बोलत हायसा? जब्या गावातला इज्जतदार मांत्रिक हाय.." आबा पाटील आश्चर्याने थक्क होऊन माझ्याकडे पाहत म्हणाला.

" पाटील, मी खरे तेच सांगत आहे..माझे खोटे वाटत असेल तर तुम्ही या तुमच्या आवडत्या नकली मांत्रिकाला विचारा." रागात एखाद्या चिडलेल्या म्हशीसारखा जब्या माझ्याकडं बघत होता.

" इन्स्पेक्टर काय लावलय तू? मी का खून करेल कोणाचा? तुझं डोकं हाय नव्ह ठिकाणावर?" मांत्रिक ओरडून म्हणाला.

" होय माझं डोक ठिकाणावर हाय.. " मी माझ्या खिशातून एक वस्तू बाहेर काढली आणि सर्वांच्या समोर ती वस्तू धरली.

"ही वस्तू, कानातील सोन्याची बाळी आहे.. जी मला मागच्या रूममध्ये सापडली होती. जिथे संतोष आणि मुरलीधर या भावांनी गळफास घेतला होता तिथं..मग मांत्रिक ही बाळी कोणाची आहे?" मी सर्वांकडे उद्देशून बोललो... आणि इशाऱ्याने मांत्रिकाच्या कानाकडे पाहा असे सुचवले. सर्वांनी मांत्रिकाच्या कानांकडे पाहिले तर त्यातील डाव्या कानात बाळी होती पण उजव्या कानात बाळी नव्हती.

" हा काही पुरावा होऊ शकत नाही इन्स्पेक्टर.. माझी कानातील बाळी रस्त्यावर कुठेतरी पडली असेल आणि तिच तुम्ही उचलली असेल?" जब्या दात काढत म्हणाला.

" अच्छा! मग तुझ्या दोन्ही हातांमध्ये मनगटावर ज्या काचेच्या पांढऱ्या आणि लाल रंगाच्या मण्याच्या माळा तू घातल्या आहेस त्यातील एक माळ कुठे आहे?" मी मांत्रिकाला पुन्हा कचाट्यात पकडले होते.

सगळे लोक मांत्रिकाकडे पाहू लागले. मांत्रिक खरे उत्तर देईल आणि तो स्वतः निर्दोष आहे असे ठणकावून या पोलिसाला दाखवतील असे सर्वांना वाटत होते.

" ती पडली असेल कुठेतरी घरात किंवा रस्त्यावर?" तितक्याच उर्मटपणाने मांत्रिकाने उत्तर दिले.

" मांत्रिक साहेब प्रत्येक वस्तू रस्त्यावर कशी पडेल? ही काल कॉन्स्टेबल रवी सोबत झालेल्या झटापटीत तुझ्या हातातील गळून पडलेली माळ आम्हाला त्या चिंचेच्या झाडाखाली मिळाली आहे. हा पुरावा ही तुला मान्य नसेल तर हा तुझा गमछा बंगल्याच्या मागच्या बगीच्यातील स्टोअर रूममध्ये सापडला.. जिथे तुम्ही संतोषच्या बायकोला बंदी बनवले होते."

संतोषची बायको इथे आता हॉलमध्ये का उपस्थित नाही हे सर्वांना आता कुठे लक्षात येत होते.

एवढे सगळे पुरावे पाहून, चिडलेला , घाबरलेला मांत्रिक चवताळून जाऊन माझ्या अंगावर आला. कमरेत खोवलेला सुरा त्याने माझ्यावर उगारला. त्या हॉलमध्ये एकच गोंधळ उडाला होता. अंगावर आलेल्या त्या धिप्पाड मांत्रिकाला मी अंगावर घेतले. त्याचा वार चुकवला आणि त्याच्या दुसऱ्या हाताला धरून मी त्याचा हात मुरगळून टाकला.

जब्या जोरात ओरडला. तेवढ्यात, हॉलमध्ये चाललेला गोंधळ ऐकून बाहेर दबा धरून बसलेले पोलिस आत धावले. त्यांनी त्या मांत्रिकाला ताब्यात घेतले. तो मांत्रिक रागाने माझ्याकडं पाहत होता. पोलिसांनी त्याला पकडल्यावर तो जागेवर उसळ्या मारत होता. पोलिसांनी त्याला गुडघ्यावर खाली बसवले.

" बोल का केलेस हे सर्व?" मी त्याच्या डोक्यावरील लांब केसांना माझ्या मुठीत धरत, त्याची मान वर करून त्याला विचारले. "का सर्व निष्पाप लोकांना मारलेस? आता तू स्वतः हून सर्वांना सांगतोस की मी सांगू? " त्याच्या केसांना गच्च आवळत मी ओरडलो.

डोळे गरगर फिरवत, भुवया आक्रसून घेत तो मांत्रिक बोलू लागला.

"सांगतो, सांगतो ...मी आणि ही अनिता (बंगल्यात घरकाम काम करणारी बाई) आम्ही दोघे एकमेकांवर प्रेम करतो. आम्हाला झटपट श्रीमंत व्हायचे होते त्यासाठी आम्ही हे नाटक रचले. घराच्या मालकाने खाली कुठेतरी तळघरात मोठा खजिना लपवला आहे असे आम्हाला माहित झाले होते त्यामुळे तो खजिना

मिळवण्यासाठी आणि ही सगळी प्रॉपर्टी, हा बंगला, शेतजमीन मिळवण्यासाठी आम्ही हे सगळे कुंभाड रचलं होत."

"आम्ही ठरवले होते एकेकाला संपवून इथे या बंगल्यावर भूतांचे राज्य आहे, भूतांचा इथे वावर आहे असे सर्व गावाला भासवून आम्हाला दोघांना सगळं काही हडप करायचं होत... त्यामुळं आम्ही हे नाटक रचलं होत."

" आम्ही घराची पूर्वीची सगळी माहिती काढली होती. संतोष आणि मुरलीधर यांच्याबद्दल बारकाईने सगळ काही माहिती करून घेतले होते. आम्ही सर्वात आधी संतोषला संपवायचा निर्णय घेतला होता. संतोषचा भोळा स्वभाव आणि घरात त्याला कोणीही काडीचीही इज्जत देत नव्हते. त्याचा आम्ही फायदा उचलला आणि सुरुवातीला आम्ही संतोषला संपवले. क्लोरोफॉर्मचा वापर करून आम्ही त्याला बेशुद्ध केले आणि रेस्टरूममध्ये त्याला फासावर लटकवले. आणि दिली अफवा उडवून , संतोषने आत्महत्या केली आणि त्याच्या बायकोमुळे, तिच्या चारित्र्यहीन वागण्यामुळे त्याने आत्महत्या केली असे उठवून दिले."

" पण त्या तुमच्या सोबत काम करणाऱ्या नोकराला का तुम्ही मारले?" मी बगीच्यात सापडलेल्या नोकराच्या मृतदेहावरून विचारले.

" मी आणि अनिता दोघेही बगीच्यातील अडगळीच्या त्या खोलीत आम्ही केलेल्या खुनाबाबत चर्चा करत बसलो होतो, आमच्या पुढच्या योजनेवर चर्चा करत होतो त्यावेळी त्या आमच्या चर्चा त्या बाबूरावने चोरून ऐकल्या आणि आमच्या

समोर येऊन, सगळे काही तुमचे पितळ उघड करेल अशी आम्हाला तो धमकी देऊ लागला. आम्हाला पोलिसांच्या ताब्यात द्यायच्या गप्पा मारू लागला.

मी आणि अनिता दोघांनीही त्याचा तिथंच काटा काढला. त्याच्या डोक्यात खोलीत ठेवलेला फावडा मारला. मार वर्मी बसला आणि बाबूराव जागेवरच गतप्राण झाला. पुढे आम्ही आयडिया करून त्या मरण पावलेल्या बाबूचे आणि संतोषच्या बायकोचे लफडे होते असे उठवून दिले. आणि आमचा प्लान यशस्वी झाला. संतोषची बायको जी सारखे माहेरी पळायची, नवऱ्यासोबत हिडीस फिडीस वागायची तिच्यावर चारित्र्यहीन वागण्याचा आरोप करणे आम्हाला सोपे गेले."

" म्हणजे तुम्ही छान पैकी संतोष आणि त्याची बायको रिया यांच्यात असणाऱ्या दुराव्याचा फायदा घेतला.. हांsssण पुढे सांग आणखी काय केले?"

" पुढे, तुम्ही पोलीस लोक तपास करायला इथे आला होता. आमच्या अडचणीत खरेतर वाढ झाली होती. पण आम्हाला या बंगल्यात राहणाऱ्या सगळ्यांचा खून करून त्याचा आरोप संतोषच्या भुताच्या किंवा धरमरावच्या भुताच्या माथी लावायचा होता. पुढे आम्ही मुरलीधर सावकार याची हत्या केली आणि जिथे संतोषला लटकवले होते तिथंच त्याच्या मोठ्या भावाला त्या जाड्या मुरलीधरला लटकवले होते."

" ...आणि त्याच वेळी तुझ्या कानातील सोन्याची बाळी झटापटीत खाली पडली होती आणि ती मला सापडली होती. " मी त्याला जास्तीची माहिती देत बोललो.

माझ्या तिरकस बोलण्याने तो मांत्रिक जास्त चिडला होता पण आता त्याचा चिडून काय उपयोग होता? तो पुढे बोलू लागला, " मुरलीधरच्या मृत्यूने या सावकार घरातील फक्त दोनच व्यक्ती जिवंत राहिल्या होत्या. एक संतोषची बायको आणि एक मुरलीधरची बायको. आणि या दोघींना संपवणे काही अशक्य नव्हते. कारण या दोघी नेहमी एकमेकींना पाण्यात पाहायच्या. एकमेकींच्या चुका काढत बसायच्या, प्रसंगी भांडणे करायच्या. पण या आमच्या सगळ्या प्लॅनमध्ये तुमची पोलिसांची मोठी अडचण आम्हाला होत होती. तुम्हाला इथून घालवण्यासाठी, तुमच्यात भुताची भिती बसवली, कधी धरमराव याचे भूत हे सगळे कामं करत आहे असे सांगितले तर कधी संतोषचे भूत हे सगळ करत आहे असे सांगितले , प्रचंड दहशत तुम्हाला बसावी म्हणून आम्ही नेहमी वेगवगेळया आयडिया वापरल्या. कालच्या रात्री चौकीवर भूत बनून मीच आलो होतो. तुम्हाला भिती घालण्यासाठी, तुम्ही या गावातून जीवाच्या भीतीपोटी निघून जावे यासाठी तुमच्या साथीदाराचा आम्ही खून केला. त्याच्या व्यसनीपणामुळे, दारू पिण्याच्या सवयीमुळे त्याला मारणे खूप सोपे गेले..."

"पण त्याच्यामुळेच तर तुमचा प्लॅन उजेडात आला. त्याला मारल्यामुळेच आम्हाला तुम्ही खरे आरोपी सापडलात. कारण रवीच्या खुन्याच्या शोधात आम्ही मागच्या बाजूने बागेतील तुमच्या अडगळीच्या खोलीपर्यंत (स्टोअर रूमपर्यंत) येऊन पोहचलो होतो." मांत्रिकाने माझ्याकडे चमकून पाहिले.

हवालदार घेऊन जा यांना. पोलिसांची टीम त्या दोघांना घेऊन गेली. सगळे लोक अनिता आणि मांत्रिक जब्या या दोघांकडे रागाने पाहत होते.

शिंदे सर मात्र मी काय सांगतोय ते ऐकायला तिथंच हॉलमध्ये थांबले होते.

" पण तुम्ही अडगळीच्या खोलीत काय पाहीले ..?" आबा पाटील यांनी उत्सुकतेने विचारले.

दीड तासांपूर्वी........

बगीच्यात असणाऱ्या नारळाची, फुलांची, फळांची झाडे, झुडपे यांना क्रॉस करून आम्ही पुढे पुढे त्या स्टोअर रूमकडे जावू लागलो.....

त्या स्टोअर रूममध्ये (अडगळीच्या खोलीत) मी आणि सुरेश दोघांनी प्रवेश केला होता. खोलीला बाहेरून लावलेले कुलूप तोडून आम्ही त्या खोलीत प्रवेश केला होता. कुलूप तोडताना माझ्या हाताला जखम झाली होती.

त्यावेळी सुरुवातीला आम्हाला धक्का बसला होता. कारण तिथं खोलीत असलेल्या टेबलवर संतोषची बायको रिया हिला बांधून ठेवले होते. तिचे दोन्ही हात पाय बांधून टाकले होते. तिच्या तोंडाला चिकटटेप लावली होती. आणि आम्हाला तिच्या हालचालीमुळे त्या खोलीच्या भिंतीवर बाहेरून सावली दिसत होती. आम्ही तिला पटकन सोडवून, तिच्या तोंडाच्या पट्टीला काढून टाकले आणि आम्ही तिला

बाहेर घेऊन आलो. ती आता पूर्ण शुद्धीत आली होती. तिने आम्हाला ओळखले होते.

" तुम्हाला कोणी बांधून ठेवले होते इथे?"

" माहीत नाही... मी माझ्या खोलीत झोपलेले होते कॉटवर..पण अचानकपणे जेव्हा मला जाग आली तेव्हा या अडगळीच्या खोलीत होते मी.. कोणीतरी हातपाय बांधून मला इथे डांबून ठेवले होते."

मी स्टोअर रूममध्ये एक नजर फिरवली. तिथं काही आक्षेपार्ह वस्तू मला आढळून आल्या. काही द्रवाने भरलेले कॅन होते. (लोकांना बेशुद्ध करण्यासाठी वापरण्यात येणारे क्लोरोफॉर्म तिथ होते.)

मी हळूच त्यांना निरखून पाहिले. मोठमोठ्या दोऱ्या होत्या, कुऱ्हाड, कोयता, सुरी यासारखी काही धारदार हत्यार होती. कुदळ, फावडे, काही झाडांसाठी वापरले जाणारे फवारणीचे औषध होते.. त्या टेबलवर काही ठिकाणी रक्ताचे डाग दिसून येत होते. टेबलच्या बाजूला मांत्रिक जो रूमाल वापरतो तो तिथं खाली पडलेला मला दिसला....मी अनुमान काढत होतो. हळूहळू एकेक गाठ सुटत होती. ह्या सर्व प्रकरणामागे मांत्रिक स्वतः आहे याची खात्री झाली होती."

***************

वर्तमान स्थिती

हॉलमध्ये सगळे चिडचूप बसले होते. मला नेहमी नाव ठेवणाऱ्या किरण वहिनी, रिया वहिनी माझी माफी मागत होत्या. रडत होत्या. जीव वाचवला त्या बद्दल धन्यवाद देत होत्या. आबा पाटील, सुरेश यांनी माझे कौतुक केले, आभार मानले आणि आमच्या शिंदे साहेबांनी तर थेट राष्ट्रपतीच्या हस्ते शौर्य पुरस्कार देण्यासाठी शिफारस करण्याचे मान्य केले. मी मात्र आहे तसा सगळ्या गोष्टी स्वीकारत होतो... जे लोक मरण पावले त्यांचा जीव मी नाही वाचवू शकलो पण पुढे होणाऱ्या हत्या मात्र टाळता आल्या आणि त्या संभाव्य लोकांचा मी जीव वाचवू शकलो त्याचे समाधान मनाला वाटत होते.

आपल्याला हे कथानक कसे वाटले?

आपले मत जाणून घ्यायला उत्सुक आहे.

**श्री. नाईकवाडे प्रमोद लक्ष्मण**

होळ, तालुका:- केज, जिल्हा:- बीड.

मोबाईल क्रमांक:- ८३२९९९१०९८, ९८२२८४८५२४

ई – मेल:- prince.naikwade09@gmail.com